शनिवार, ६ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२४०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 6 MAY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-240 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5




# राजीनामा रद्द, विषय बंद

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारच

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याबाबत मोठा निर्णय घेतला होता. अखेर कार्यकर्ते आणि नेत्यांच्या आग्रहानंतर शरद पवारांनी राजीनामा देण्याचा निर्णय मागे घेतला आहे. शरद पवार म्हणाले की, मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर तीव्र भावना उमटल्या. तसेच मी निर्णयाचा पुनर्विचार करावा म्हणून माझे हितचिंतक, माझ्यावर प्रेम आणि विश्वास असणारे कार्यकर्ते, असंख्य चाहते यांनी संघटीत होऊन एकमुखाने आवाहन केले.**

देशभरातून विशेषतः महाराष्ट्रातून विविध राजकीय पक्षाचे नेते आणि सहकारी, मी अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा घ्यावी, अशी विनंती केली. लोक माझे सांगाती, हेच माझ्या परीने प्रदीर्घ सार्वजनिक जीवनाचे गमक आहे, माझ्याकडून आपल्या भावनाचा अनादर होऊ शकत नाही. आपण दर्शवलेले प्रेम आणि विश्वास यामुळे मी भारवून गेलो आहे, असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. माझ्या निर्णयापासून परावृत्त होण्यासाठी आपण सर्वांनी केलेली आवाहने आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांच्या बैठकीत त्यांनी घेतलेला निर्णय याचा विचार करून मी पुन्हा अध्यक्षपदी रहावे या निर्णयाचा मान राखून राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय मागे घेत आहे, असेही शरद पवारांनी नमूद केले.



**...पण भाकरी थांबली ! :** शरद पवारांनी निवृत्तीचा निर्णय जाहीर केल्यावर शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी एक ट्वीट केले होते. त्यात राऊत म्हणाले होते की, ' पवार भाकरी फिरवण्याबद्दल बोलले होते, पण यांनी तवाच फिरवला. याबाबत एका माध्यमाच्या प्रतिनिधीने शरद पवारांना प्रश्न विचारल्यावर शरद पवार म्हणाले, मी भाकरी फिरवायला निघालो होतो, पण भाकरी थांबली.

# जम्मूमध्ये ग्रेनेड हल्ला; पाच जवान शहीद



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराच्या वाहनावर पुन्हा एकदा हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांनी भारतीय सैन्याच्या वाहनावर जम्मू काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात ग्रेनेड हल्ला केला आहे. या हल्ल्यात पाच जवान शहीद झाले आहेत. या चकमकीत काही दहशतवाद्यांचाही खात्मा करण्यात जवानांना यश आले असून भारतीय सैन्याकडून सर्च ऑपरेशन सुरूच आहेत.

मुसळधार पाऊस आणि दृष्यमानता कमी झाल्याचा फायदा घेत २० एप्रिल रोजी अतिरेक्यांनी भारतीय लष्कराच्या वाहनांवर हल्ला केला होता. या हल्ल्यात पाच जवान शहीद झाले होते. याप्रकरणातील दहशतवाद्यांचा शोध घेण्याकरता ३ मे पासून अभियान राबवण्यात येत आहे. राजौरी जिल्ह्यातील कांडी भागातील केसरी हिल येथे दहशतवाद्यांचा गट लपला असल्याची माहिती जवानांना मिळाली होती. त्यानुसार, त्यांनी हे सर्च ऑपरेशन राबवले.

आज जम्मूमध्ये मसुळधार पाऊस आहे. या मुसळधार पावसातच लष्कराचे सर्च ऑपरेशन सुरू होते. राजौरी जिल्ह्यात गोळीबार करण्यात आला. प्रत्युत्तर म्हणून दहशतवाद्यांनीही गोळीबार केला. तसंच, वाहनावर ग्रेनेड हल्ला केला. यामुळे दोन जवान जागीच शहीद झाले तर चारजण जखमी झाले. जखमींना तातडीने उपचार मिळावेत म्हणून त्यांना हेलिकॉप्टरने रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, चार जखमींपैकी तिघांचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळे एकूण मृतांचा आकडा ५ झाला आहे. २०२१ च्या ऑक्टोबर महिन्यातही लष्कराने राबवलेल्या सर्च ऑपरेशनमध्येही पाच जवान शहीद झाले होते. तसंच, त्यानंतर पुन्हा राबवण्यात आलेल्या चकमकीतही चार जवान शहीद झाले होते. हे ऑपरेशन महिनाभर राबवण्यात आले होते. परंतु, एकाही दहशतवाद्याला पकडण्यात आले नव्हते.

# 'समाजाला आतून पोखरण्याचा आवाज येत नाही'

आधुनिक केसरी न्यूज

**बेल्लारी :** 'द केरला स्टोरी' या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाल्यापासूनच वाद सुरू झाला आहे. केरळ सरकारने या चित्रपटाला संघ आणि भाजपाचा प्रोपगंडा करणारा म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त आहेत. बेल्लारी येथील प्रचारसभेत बोलताना नरेंद्र मोदी यांनी द केरला स्टोरी या चित्रपटाचा उल्लेख करत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, दहशतवादी कट असलेल्या एका कथानकावर आधारित चित्रपट 'केरला स्टोरी' सध्या खूप चर्चेत आहे. हा चित्रपट केवळ एका राज्यातल्या दहशतवादी कटांवर आधारित आहे. केरळ हे देशातले खूप सुंदर राज्य आहे. केरळमधले लोक खूप परिश्रमी आणि प्रतिभावान असतात. परंतु त्याच केरळमध्ये सुरू असलेल्या दहशतवादी कटाचा खुलासा या चित्रपटाने केला आहे.पंतप्रधान म्हणाले, बॉम्ब-बंदूक आणि पिस्तूलाचा आवाज ऐकू येतो. परंतु समाजाला आतून पोखरण्याचा आवाज येत नाही. कोर्टानेही आतंकवादाच्या या स्वरुपाबाबत चिंता व्यक्त केल्या आहेत. परंतु आपल्या देशाचे दुर्भाग्य बघा. आपल्या समाजाला उद्ध्वस्त करणाऱ्या या दहशतवादी प्रवृत्तीच्या पाठीशी काँग्रेस उभी आहे. नरेंद्र मोदी म्हणाले, काँग्रेस दहशतवादी प्रवृत्ती असलेल्या लोकांशी मागल्या दाराने राजकीय सौदेबाजी देखील करत आहे. म्हणूनच कर्नाटकमधील लोकांनी या काँग्रेसपासून सावध राहिले पाहिजे. हे लोक चित्रपटावर बंदी आणण्याचा प्रयत्न करत आहेत. मी काँग्रेसला असे काही करताना पाहतो तेव्हा मला खूप आश्चर्य वाटते.


# शासकीय रुग्णालयात उपचारासाठी विचारली जाते जात

## सरकारकडूनच केल्या जाणाऱ्या जातीयवादाला अंनिसचा आक्षेप

आधुनिक केसरी न्यूज


**निफाड :** शासनाच्या आरोग्य खात्याकडून लोकसेवेस समर्पित अशा सरकारी रुग्णालयातून उपचारासाठी काढण्यात येणाऱ्या केसपेपर वर जातीचा रकाना आहे. नाशिक जिल्ह्यातील एका शासकीय दवाखान्यात एका रुग्णाला त्याची जात लिहिल्या नंतरच त्याच्यावर पुढील उपचार करण्यात आले असल्याची धक्कादायक बाब अंनिसच्या निदर्शनास आल्यानंतर अंनिसच्या वतीने राज्याचे आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून सदरहू रकाना रद्द करण्याची मागणी केली आहे.

याबाबत संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने काही विशिष्ट जातीच्या लोकांमध्ये विशिष्ट आजार असतात. त्यावर उपचार करण्यासाठी हा रकाना असून शासनाकडूनच हा फॉरमॅट आला आहे असा अतिशय अतार्किक, अजब व धक्कादायक खुलासा केला आहे. त्यामुळे शासनाच्या आरोग्य खात्याकडूनच जातीभेदाला खतपाणी घालण्याचा असंवैधानिक प्रकार होत आहे. कोणत्याही रुग्णावर त्याची जात, धर्म, लिंग, वंश पाहून उपचार केले जाऊ नयेत, असे घडत असेल तर ती सरळ सरळ भारतीय नागरिकांच्या समानतेच्या हक्काची पायमल्ली आहे. त्यामुळे राज्य सरकारने यावर गांभीर्याने विचार करून तातडीने रुग्णाला देण्यात येणाऱ्या केस पेपरवर जातीचा उल्लेख दर्शविणारा कॉलम तातडीने काढून टाकावा अशी मागणी केली आहे. निवेदनावर डॉ.ठकसेन गोराणे, राज्य प्रधान सचिव, कृष्णा चांदगुडे, राज्य कार्यवाह, नितीन बागुल, जिल्हा प्रधान सचिव, महेंद्र दातरंगे जिल्हा बुवाबाजी विरुद्ध संघर्ष सचिव आदींच्या सह्या आहेत.




जात ही एक अंधश्रद्धा आहे असे महाराष्ट्र अंनिसचे ठाम मत आहे . शासन सुद्धा जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत आहे . असे असतांना रुग्णाला जात विचारणे हे पुरोगामी महाराष्ट्राला नक्कीच लांच्छनास्पद आहे . जातीचा रकाना हटविण्यासाठी आम्ही शासनदरबारी प्रयत्न करत असून जोपर्यंत निर्णय लागत नाही तोपर्यंत लढा सुरू राहील .

**कृष्णा चांदगुडे,**
**राज्य कार्यवाह, महाराष्ट्र अंनिस**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

इमारतींभोवती घाण आढळली तर इमारतीत राहणाऱ्या सगळ्याच रहिवाशांना दंड भरावा लागे. बसमध्ये किंवा रस्त्यावर एखाद्या मुलाने घाण केली तर पोलीस त्याच्या पालकांना बोलावून ती घाण साफ करायला लावत. कितीही मोठा उच्चपदस्थ अधिकारी वा व्यक्ती असली तरी त्याची या शिक्षेतून सुटका होत नव्हती. येथील वाहतुकीचे नियम तर अतिशय कडक आहेत. वाहतुकीच्या नियमांचे लोक कसोशीने पालन करतात. सिग्नल कोणीही तोडत नाही. वेगाची ठरलेली मर्यादा कोणीही ओलांडत नाही. नियम तोडल्यास जबर शिक्षा किंवा दंड भरावा लागतो. लोकांच्या अंगवळणी पडलेल्या सवयी बदलायला वेळ जरूर लागतो. पण राजकीय नेतृत्वाकडे इच्छाशक्ती आणि दूरदृष्टी असेल तर यात नक्की सुधारणा होऊ शकते. लोकांच्या सवयी बदलतात आणि त्यांना शिस्त लागते हे आपल्याला सिंगापूरकडे पाहिले म्हणजे कळते. सिंगापूरमध्ये सुरुवातीला प्रचंड भ्रष्टाचार होता. ली यांनी कठोरपणे हा भ्रष्टाचार निपटून काढायचे ठरवले. त्यासाठी कडक कायदे केले. भ्रष्टाचार विरोधी पथकाला त्यांनी त्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिलं. सामान्य माणूस असो, मंत्रीअसो वा अधिकारी, भ्रष्टाचार सिद्ध झाला तर त्यांना तुरुंगवास हा अटळ. आज सिंगापूर भ्रष्टाचार मुक्त राष्ट्रातील एक देश आहे. कामचुकार लोकांसाठी त्यांच्या प्रशासनात जागा नव्हती. शिस्तप्रिय आणि काम करणाऱ्या लोकांना हुशार विद्यार्थ्यांना त्यांनी उत्तेजन दिले. अमली पदार्थ जवळ बाळगणे वा त्याची तस्करी करणे हा गंभीर गुन्हा आहे. हा गुन्हा सिद्ध झाल्यास सिंगापूरमध्ये अशा व्यक्तीला फाशीच्या शिक्षेपासून कोणी वाचवू शकत नाही. पंतप्रधान झाल्यानंतर सिंगापूरच्या रक्षणाच्या दृष्टीने ली यांनी अत्याधुनिक लष्कराची उभारणी केली. त्यासाठी इस्रायल या छोट्या देशाचा आदर्श त्यांच्यासमोर होता. इस्रायलच्या मदतीने आणि मार्गदर्शनाखाली त्यांनी अत्यंत सुसज्ज, शिस्तबद्ध आणि लढाऊ लष्कराची बांधणी केली. आज सिंगापूरचे लष्कर जगातील श्रेष्ठ लष्करांपैकी एक आहे. सिंगापूरमधील अठरा वर्षे पूर्ण झालेल्या तरुणांना दोन वर्षे राष्ट्रीय सेवा योजनेसाठी द्यावी लागतात. त्यात लष्करी शिक्षणाचा समावेश असतो.



## आनंदी पहाट

# प्रत्येक विचार गांभीर्याने करावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेला बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचं तर काहींमध्ये काही विकृतीचं दर्शन आपल्याला घडत असतं. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा का होत नाही? कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्यानं का चर्चा करत राहतो? आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरंच गांभीर्यानं विचार करतो का?
आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. आठवणी म्हणजे आनंदाचे कंद, हे एकीकडे आपण अनुभवत असतो, पण त्या आठवणींत आपण स्वतः किती व्यस्त व्हायचं, ह्याचं भान राखणं देखील महत्वाचं ठरतं. जोपर्यंत काही घडतंय तो पर्यंत सर्व ठीक आहे; पण जेव्हा काही बिघडेल तेव्हा मात्र निस्तरणे मुश्कील ठरू शकतं. ह्याची जाणीव आपल्याला होणं अधिक महत्वाचं आहे. कित्येकदा, ह्या आठवणीच आपल्या मनाला उभारी देत असतात. आपला मानसिक एकलेपणा दूर करण्याच्या कामी येतात. आपण शरीरानं एका वेळेला एकाच ठिकाणी जाऊ शकतो, पण गत काळातल्या आठवणी मात्र आपल्याला अनेक ठिकाणांची सफर करवून आणतात.



आधुनिक केसरी

**जीव-शीव जाणे | आत्माराम ||**

जयाचिये कुळी | पुण्याईचा मेळ ||
अध्यात्माचे मुळ | तेथे नांदे ||१||
संगतीने झाला | जरी दिशाहीन ||
परी अंती लीन | होय मना ||२||
बुध्दी भेद होता | चूकते रे वाट ||
विकाराचे ताट | गोड भासे ||३||
भौतिकाचे घर | आभासी दिखावा ||
भुललासी जीवा | मृगजळी ||४||
परमात्म्याची हाक | ऐकता आत्म्याने ||
जीव-शीव जाणे | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

न जायतेर्थबोधस्तु
सुदीर्घं जल्पनं ततः ।
न तथा सुजनः खलु
नायाति व्यसनेपि सः ।।३ ।।
खूप वेळ बडबड करूनही अर्थबोध होत नाही, तर तो खरोखर सज्जन नसतो. तो संकटातही (सहाय्यास) येत नाही.




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सुख कारण सत्संग है,
अरु सद्गुरु पद सेव ।
प्रेम सन्त निष्कपट से, कारण परहित सेव
।।४८।। (स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/४८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
सुखाचे कारण सत्संग आणि सद्गुरूंची चरण सेवा आहे. संतांच्या कपटरहित प्रेमाने सुख प्राप्त होते तसेच परहित (परोपकार), सेवा ही सुखाची कारणं आहेत.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मुर्तीमंत भगवंत भेटला

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

हजारो,लाखो वर्षांच्या देवादिकांच्या कथा या आजचं घडल्या आहेत असं भक्तिमार्गाची वाट धरलेल्या भावीकांना वाटतं. मित्रांनो आजही अशीच एक चिद्निरंतर घटना मी तुम्हाला सांगणार आहे. ते म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध भगवंताची! आपल्याला महान संस्कृतीचं देणं लाभलं आहे. त्या विषयी आपण माहिती करून घेऊ. अंबरीष राजाने एकादशीचे व्रत केले होते. ते ही अंगिरस ऋषींच्या यज्ञात सहभाग घेऊन आपली विद्वत्ता अवघ्या जगाला दाखवली.

# शंका न ठेवता नाम घ्यावे

आधुनिक केसरी

नामस्मरण करायला सांगितले की लोक सबबी सांगतात. पण खरोखर, नामस्मरण करण्याच्या आड काहीच येत नाही. काम करीत असतानासुद्धा उगाचच इतर विचार मनात येतातच ना ? मग तसेच नामस्मरण करायला कोणती अडचण आहे ? उगाच दुसरे विचार करण्यापेक्षा भगवंताचे नाम घ्यावे हे बरे नाही का ? वेळ सापडताच तो व्यर्थ गप्पागोष्टीत न घालविता नामस्मरण करावे; श्रद्धा ठेवून करावे. दोन प्रवासी पायी जात होते. त्यांना भूक लागली. जाताना एक आंबराई लागली. त्यांनी मालकाला विचारले, 'आंबे घेऊ का ?' मालक म्हणाला, 'पंधरा मिनिटांत जितके आंबे खाता येतील तितके खा.' दोघांपैकी एक होता, तो मालकाजवळ चौकशी करू लागला; या शेताला पट्टी किती, मालक कोण, वगैरे पुष्कळ विचारपूस करू लागला. दुसरा मात्र भराभर आंबे खाऊ लागला. इतक्यात पंधरा मिनिटे झाली. मालकाने सांगितले, 'वेळ संपली, आता तुम्ही जा.' एकाचे पोट भरले, दुसरा मात्र उपाशी राहिला. या गोष्टीवरून हे ध्यानात घ्यायचे की, नुसते प्रश्न विचारण्यापेक्षा, श्रद्धा ठेवून



नाम घेऊ लागावे. नामाचा अर्थ आपल्याला जरी कळला नाही, तरी तो भगवंताला कळतो. म्हणून नामाचे महत्त्व कळो वा न कळो, नाम घेत राहावे. ध्रुवाने काय केले ? नारदवचनावर विश्वास ठेवून नामस्मरण प्रेमाने करू लागला. तो इतर विचारांच्या, शंकाकुशंकांच्या नादी लागलाच नाही. 'एक तत्त्व नाम' हेच त्याने धरले, म्हणून त्याला नारायण प्रसन्न झाला. संत निःस्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवावी आणि नाम घ्यायला सुरुवात करावी आणि अखंड नामातच राहावे. नाम किती दिवस घेत राहावे ? नाम सोडावेसे वाटत नाही तोपर्यंत ते घ्यावे. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे. नामस्मरणात रंगला की नाम सुटणारच नाही. भगवंताचे नाम हेच श्रेष्ठ आहे. त्या नामात रंगेल तोच खरा. चरित्र विसरले तरी चालेल पण नाम विसरू नये, कारण नामात सर्व चरित्र साठविलेले आहे. ज्ञान, उपासना, कर्म वगैरे मार्ग आहेत, पण सर्वांत नामस्मरण हे सोपे साधन आहे. एक मोठा किल्ला होता. तो अभेद्य होता. मुंगीलाही आत प्रवेश होणे अशक्य असा तट होता. पण त्याला एक मोठा दरवाजा होता. त्याला एक मोठे कुलूप होते. एकाला त्याची किल्ली मिळाली; मग प्रवेश सुलभ झाला. तसे नाम ही किल्ली आहे. परमार्थ कितीही कठीण असला तरी नामाने तो सुसाध्य असतो. नामावर प्रेम आणि श्रद्धा बसत नाही अशी तक्रार करतात. संतवचनावर विश्वास ठेवून अखंड नाम घ्यावे, त्यानेच समाधान होईल. **आजचे बोधवचन आहे – आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्या वाचून अडून बसू नये.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥३॥
घेऊनियां चक्र गदा । हा चि धंदा करी तो ॥१॥
भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥ध्रु.॥
अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥२॥
तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥३॥

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ स्पष्टीकरण : आपल्या हृदयात आत्मा नावाचा एक देव आहे. त्याची शक्ती तुम्ही वाढविलीत, तर तोच तुमचा मित्र बनेल आणि तुम्हाला तुमच्या उत्कर्षाचा मार्ग दाखवील. त्या मार्गात तो तुम्हाला मदतही करील. या उलट 'मी कोण ? माझ्या हातून काय होणार आहे ? असे म्हणून तुम्ही हातपाय गाळून बसलात, की तुमचा आत्माही खचेल आणि तुमचा शत्रू होईल. मग तुमच्या हातून काहीच होणार नाही. तेव्हा तुम्ही तुमच्या आत्म्याचा कधीच अवमान करू नका.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ६ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# रुग्णांना जात विचारण्याचा प्रकार घटनाविरोधी

## अजित पवार : नाशिक जिल्ह्यातील मनमाड उपजिल्हा रुग्णालयातील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नाशिक जिल्ह्यातील मनमाड उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना त्यांची जात विचारण्याचा प्रकार जातीभेदाला खतपाणी घालणारा, घटनाविरोधी, मानवताविरोधी, राज्य शासनाची असंवेदनशीलता, आजारी मानसिकता दाखवणारा आहे. शासकीय किंवा खाजगी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या कोणत्याही रुग्णाला त्याची जात विचारली जावू नये. मनमाड उपजिल्हा रुग्णालयासह राज्यात अन्यत्र कुठेही असे प्रकार सुरु असतील तर ते तात्काळ थांबवावेत, अशी मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील मनमाड उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना त्यांची जात विचारली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रुग्णालयांमध्ये रुग्णांची माहिती भरण्याच्या 'केसपेपर'मध्ये जातीचा रकाना असून त्याठिकाणी जात लिहिणे बंधनकारक असल्याचे सांगितले जात आहे. यासंदर्भातील बातम्या माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. रुग्णांना त्यांची जात विचारुन नंतर उपचार करण्याचा प्रकार, जातीभेदाला खतपाणी घालणारा, घटनाविरोधी, मानवताविरोधी, शासनाची



असंवेदनशीलता, आजारी मानसिकता दाखवणारा असल्याचे सांगत अजित पवार यांनी त्याला विरोध केला आहे.

शासकीय किंवा खाजगी कोणत्याही रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या कोणत्याही रुग्णाला त्याची जात विचारली जावू नये. मनमाड उपजिल्हा रुग्णालयासह राज्यात अन्यत्र कुठेही असे प्रकार सुरु असतील तर ते तात्काळ बंद करण्याचे निर्देश मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी संबंधितांना द्यावेत, अशी मागणी अजित पवार यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या रुग्णालयातही रुग्णांना जात विचारण्याचा प्रकार यापूर्वी घडला होता. शेतकऱ्यांना खतखरेदी करण्यासाठीही जात सांगणे अलिकडे बंधनकारक केले होते. त्यावेळीही भविष्यात असे प्रकार थांबवण्याचा आम्ही सरकारला इशारा दिला होता. त्यानंतरही हा प्रकार घटला असल्याकडेही अजित पवार यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे.

अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी गरज नसताना नागरिकांना त्यांची जात विचारण्याचा घटना वाढत आहे राज्यसरकारने या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन हे प्रकार थांबवावेत. समाजात जातीभेद निर्माण करण्यास प्रोत्साहन देऊ नये, असे आवाहन अजित पवार यांनी सरकारला केले आहे.



# बाल संस्कार शिबिरात सांप्रदायिक धडे...!

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** शाळकरी मुलांमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीत संस्कार व व्यक्तिमत्व विकास व्हावा, यासाठी 25 दिवसीय बाल संस्कार शिबिराला सुरूवात झाली. येथील पांडूरंग इंग्लिश स्कूल येथे पंढरीनाथ महाराज पगार यांच्याहस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रामेश्वर महाराज भागवताचार्य ज्योतीताई सोनवणे प्रा.संतोष सुर्यवंशी सोनवणे, पुरुषोत्तम महाराज, चांगदेव महाराज, गणेश महाराज, आरुण महाराज मयुर महाराज योगेश महाराज, अशाताई मगर छायाबाई मगर राणी सुर्यवंशी योगुरु आजिनाथ एखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बाल संस्कार शिबिराच आयोजन करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभलेली आहे. साधू-संतांनी समाजाला अध्यात्माचा चांगला मार्ग दाखवला. आजच्या नवीन भरकटत चाललेल्या पिढीला संस्कृती व संस्कार टिकण्यासाठी अध्यात्माच्या मार्गावर घेऊन जाणे ही काळाची नितांत गरज बनली आहे. यासाठी बाल संस्कार भरवले असून बाल संस्कार ञशिबिरात विद्यार्थी सांप्रदायिक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत.

शिबिरामध्ये दररोज विद्यार्थ्यांना युगपुरुष आजिनाथ एखंडे प्राणायाम, योग, मुल्यशिक्षण, विविध खेळ, आरोग्य, आहार, दैनंदिन व्यवहार, सामान्य ज्ञान, चित्रकला, विज्ञान व मानवी जीवन, राष्ट्रभक्ती अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहेत. भारतीय संस्कृतीचा मान वाढविन्यामध्ये वारकरी संतांचे मोठे योगदान आहे . मानवी जीवन सुसंस्कारीत करण्यासाठी संतांनी विविध मार्ग सांगितले. त्यांतील महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे संतांनी निर्माण केलेले ग्रंथ. संस्कार त्यातील विचार सामान्य समाजापर्यंत पोहचवन्याची सोपी पध्दती म्हणजे बाल संस्कार शिबिर होय. नैतिक आचरण, त्याग, ईश्वराविषयी प्रेम, या तत्वावर संता नी जीवन समर्पित केले शिक्षण, संस्कार, संस्कृति व धर्म या संत परमपरा टिकविण्याकरिता तरुणांनी एकत्रित येऊन संतविचार, आचरणात आणावे सुंदर जीवन जगण्यासाठी नैतिकता, स्वच्छता, निष्ठता व संवेदनशीलता या मूल्यांचे पालन करावे भारतीय संस्कृतीतसंस्काराला फार महत्त्व आहे. मनुष्यावर विविध संस्कार करावे. संस्कारच मनुष्याला श्रेष्ठ बनवितात, उत्तम आकार देतात. सर्वोत्तम जीवनाचा पाया हा शाळा आहे. संस्कारसंस्कृतीनेच उत्पन्न होतात. तसेच संस्कृती पणसंस्कारांवर आधारित असतात. संस्कारामुळे चांगल्या गुणांचा फक्त व्यक्तिगत लाभ नसतो तर सर्व समाज त्यापासून लाभान्वित होतो. आदर्श नागरिक बनविण्याची सुरुवात शाळेतूनच होते. चांगल्या सवयीचं आणि चांगल्यासंस्काराचं महत्त्व पटवूनआपली दिनचर्या नियमित ठेवणे, पालन करणे. या सर्व गोष्टी स्वस्थ मानवी जीवनाकरिता आवश्यक आहेत. या सर्व गोष्टींची सुरुवात घरातूनच व्हायला हवी. मुलांना एक चांगला मानव व आदर्श नागरिक बनविण्याची सुरुवात घराघरातूनच व्हायला हवी. चांगल्या सवयीचं आणि चांगल्यासंस्काराचं महत्त्व पटवून द्यायला हवं. ज्योतीताई महाराज सोनवणे यांनी सांगितले. शिबिरासाठी पंचक्रोशीतील नागरीक नाष्टा जेवणाच्या पंगतीत देत आहे.

आलेल्या 25 दिवसाच्या संस्कार शिबिरात देशभक्तीपर गीत, सूर्य नमस्कार, योगासने, आरोग्य विषयक मार्गदर्शन, खेळातून स्मरणशक्ती वाढ हे भारतीय संस्कृतीची जपवणूक तसेच शारीरिक तंदुरुस्तीसाठी आवश्यक असलेले कार्यक्रम मुलांचे भवितव्य घडवण्यात मोलाचे ठरतील. यावेळी प्रा.संतोष सुर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले.

> बालसंस्कार शिबीर ही काळाची गरज आहे . आज चे विद्यार्थी संस्कार अणि शिस्त पासून दूर गेले आहेत . मुलांना संस्कृती संस्कार माहीत होण्यासाठी आणी मुलांना स्वावलंबी अणि शिस्त प्रिय करण्यासाठी बालसंस्कार शिबीर गरजेचे आहे . त्यासाठी आम्ही दरवर्षी शिबिराचे आयोजन करणार आहोत
> **प्रा .संतोष सुर्यवंशी, पांडुरंग इंग्लिश स्कूल प्राचार्य**

> संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दोषांचा भागाकार . गुणांचा गुणाकार याचा अर्थ स्वत :मधील गुण वाढवायचे आणि दोषांचा भागाकार याचा अर्थ स्वत :मधील दोष कमी करायचे . मनन करून, सर्वांगीण विचार करून कृती करतो तो मानव . विचार व कृती चांगल्या होण्यासाठी संस्कारांची गरज असते . भारतीय शास्त्राप्रमाणे प्रत्येक कृतीच संस्कारयुक्त असली पाहिजे .
> **भागवताचार्य ज्यातीताई महाराज सोनवणे**

# सावरकरांचा जन्मदिन 'गौरव दिवस' म्हणून साजरा करणे हा स्वातंत्र्य सैनिकांचा अपमान

## नक्षलवाद्यांच्या पत्रकाने उडाली खळबळ

आधुनिक केसरी न्यूज



**गडचिरोली :** स्वातंत्र्य संग्रामातून पळ काढत इंग्रजांची पाचवेळा माफी मागणाऱ्या सावरकरांचा जन्मदिन 'गौरव दिवस' म्हणून साजरा करणे, हा स्वातंत्र्य सैनिकांचा अपमान असल्याची टीका नक्षल्यांनी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे. भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या ( माओवादी ) दंडकारण्य पश्चिम सब झोनल ब्यूरोचा प्रवक्ता श्रीनिवास याने हे पत्रक काढले आहे. नक्षलवाद्यांनी काढलेले हे पत्रक समाज माध्यमावर सार्वत्रिक झाले आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, मोदी जेव्हापासून सत्तेत आले. तेव्हापासून देशाचे भगवेकरण सुरू आहे. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात सुरवातीच्या काळात सावरकर सक्रिय होते. परंतु, इंग्रजांच्या तावडीत सापडल्यानंतर त्यांना अंदमानात काळ्यापाण्याची शिक्षा झाली. त्यानंतर त्यांनी आपली भूमिका बदलली. इंग्रजांची माफी मागून स्वतःची सुटका करून घेतली. एवढ्यावरच न थांबता हिंदू महासभा सारख्या संघटनेला पुढे करून 'भारत छोडो' आंदोलनात इंग्रजांचे समर्थन केले. १९२३ ला लिहिलेल्या 'हिंदुत्व' पुस्तकात धर्मावर आधारित देशाची संकल्पना मांडली. हिंदू, मुस्लिम द्वेष वाढविला. एकीकडे भगतसिंग, सुभाषचंद्र बोस सारख्या योद्ध्यांनी इंग्रजांविरोधात बंड पुकारत आपल्या प्राणाची आहुती दिली. तर दुसरीकडे सावरकर यांनी देशात द्वेष पसरवून इंग्रजांना साथ दिली. देशासोबत गद्दारी करणाऱ्या अशा व्यक्तींचा जन्मदिन एकनाथ शिंदे यांचे सरकार 'गौरव दिवस' म्हणून साजरा करणार आहे. हा निर्णय खऱ्या स्वातंत्र्यविरांचा अपमान करणारा आहे. या निर्णयाचा देशातील बुद्धिवाद्यांनी विरोध करावा, असे आवाहन नक्षल्यांनी पत्रकाच्या माध्यमातून केले आहे.



# संघर्षावर ठाम

आधुनिक केसरी

गेल्या बारा दिवसांपासून दिल्लीच्या जंतर-मंतर या ठिकाणी कुस्तीपटुंचे आंदोलन सुरु आहे. आज शुक्रवारी (5 मे) रोजी या आंदोलनाचा 12 वा दिवस आहे. जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत संघर्ष करत राहणार असल्याची भूमिका या आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. 3 मे रोजी आंदोलनकर्त्यांमध्ये आणि दिल्ली पोलिसांमध्ये रात्री उशीरा वाद झाला. तसेच 'जर आता न्याय मिळाला नाही तर आम्ही आम्हाला मिळालेली पदकं देखील परत करु', अशी देखील भूमिका या आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. ब्रिजभूषण सिंह यांच्यावर महिला कुस्तीपटूंच्या लैंगिक छळाचा गंभीर आरोप होऊनही त्यांच्यावर मोदी सरकारकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे देशातील महिला कुस्तीपटू पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्या आहेत. दरम्यान, 18 जानेवारी 2023 रोजी कुस्तीपटू विनेश फोगाट, साक्षी मलिक आणि बजरंग पुनिया यांच्यासह 30 कुस्तीपटूंनी दिल्लीच्या जंतरमंतरवर धरणे आंदोलन केले होते. आंदोलनात सामील झालेल्या सात कुस्तीपटूंनी भाजप खासदार ब्रिजभूषण यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते. विनेश फोगाटने भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांनी राष्ट्रीय शिबिरात महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. याची चौकशी करण्यासाठी दोन समित्याही स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यावेळी क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून कुस्तीपटूंनी विरोध संपवला होता. मात्र, याप्रकरणी कोणतीही कारवाई न झाल्याने भारतीय कुस्तीपटूंमध्ये नाराजी आहे. जंतर-मंतर याठिकाणी सुरु असलेल्या आंदोलनावर पोलीस कारवाई करताना दिसत आहेत. 3 मे रोजी या आंदोलन कर्त्यांमध्ये आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. विनेश फोगाट, बजरंग पुनिया यांसारख्या कुस्तीपटूंना या संघर्षात दुखापत देखील झाली. तसेच या कुस्तीपटूंबरोबर गैरवर्तन करत असल्याचा आरोप या कुस्तीपटूंनी केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या महिला कुस्तीपटूंनी उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. गुरुवारी 4 मे रोजी झालेल्या सुनावणीत सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, अल्पवयीन आंदोलन करत असणाऱ्या मुलींना सुरक्षा देण्यात आली आहे.

# 'मनकी बात'ची चेष्टा म्हणजे जनतेचा अपमान नव्हे का ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**आपल्या देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी मनकी बात हा विषय सुरू करून जवळपास नऊ वर्षे होत आली. कालच्या 30 एप्रिल रोजी 100 वा एपिसोड देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा झाला. प्रत्येक महिन्याच्या ठरलेल्या तारखेला स्वत: पंतप्रधान कार्यव्याप्त वेळ काढून आकाशवाणी केंद्रावर तथा इतर माध्यमांसमोर येवुन देशवासियांच्या सोबत संवाद साधतात. आजवर त्यांनी प्रत्यक्ष या देशातील शेतकरी, कष्टकरी, मजुर, ऊसतोड कामगार, बेरोजगार, व्यापारी, महिला, उद्योजक, क्रीडा, सांस्कृतिक, रूढी, परंपरा जिथे चालवल्या जातात त्या सर्व क्षेत्राशी संवाद करून प्रोत्साहन दिलेले आहे.**

अगदी सामान्य माणुस गरिबातला गरिबाला देखील थेट त्यांचा झालेला संवाद हा खऱ्या अर्थाने आयुष्य जगण्यासाठी आशेचा किरण म्हणावा लागेल. महाराष्ट्रासह संपुर्ण देशात या उपक्रमाचे कौतुक केल्या जातं. मात्र विरोधक एवढे नतद्रष्ट की त्यांच्या बुद्धीची कीव येते. काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, खा.संजय राऊत यांच्याकडून उपक्रमाची होणारी सतत अवहेलना आणि चेष्टा म्हणजे खऱ्या अर्थाने देशातील 142 कोटी जनमनांचा अपमानच समजावा लागेल. विरोधासाठी विरोध काही पण बोलायचं आणि उपक्रमाला नाव ठेवायचं याशिवाय विरोधकांना काही दिसत नाही हे मात्र नक्की. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवुन नाही म्हटलं तरी साठ-सत्तर वर्षे झाली पण असा एकही पंतप्रधान होवुन गेला नाही ज्याने जनतेच्या मनातल्या भावना ओळखुन त्यांच्याशी संवाद केला आणि खऱ्या अर्थाने देश चालवला. नरेंद्र मोदी एकमेव पंतप्रधान 2014 ला केंद्रात सत्ता आल्यानंतर हा उपक्रम विशेषतः रेडीओ आकाशवाणीद्वारे त्यांनी सुरू केला. तिथेच गंमत बघा, बदलत्या तंत्रज्ञानात आकाशवाणी अर्थात रेडीओ हे साधनच निर्जिव झाले होतं. केवळ या उपक्रमाने पुनर्जिवीत झालं अर्थात इतर माध्यमे वेगवेगळे तो भाग असु शकतो. देशाचा कारभार करताना खरंच आपण जनतेशी संवाद साधला पाहिजे ही दुरदृष्टी ज्या नेतृत्वात असते तो देश वैचारिकदृष्ट्या समृद्ध होवु शकतो. नेमकं हेच उपक्रमातुन घडलं. मनकी बात अर्थात देशातील कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या विषयात ज्यांची अमुल्य कामगिरी अमुल्य असं योगदान त्यांच्याशी संवाद त्याहुन अधिक शेतकरी, कष्टकरी सुरूवातीला उल्लेख केल्याप्रमाणे समाजातील सर्व वर्ग समुदायासोबत थेट पंतप्रधानांनी मनाच्या ऱ्हदयातुन नातं जोडण्याचा हा खटाटोप केला. अगदी ऑलिंपिकमध्ये कुणी बक्षिस मिळवलं तर त्यांच्याशी थेट संवाद एखादा शेतकऱ्यांनी केलेली कामगिरी असेल किंवा कष्टकऱ्यांने राबवलेले उपक्रम युवकांनी दिलेलं योगदान या साऱ्या विषयाची नोंद स्वतः पंतप्रधानांनी घेणं समाज व्यवस्थेतला एक नविन आदर्श उभा करणं हे तर नक्कीच होय. वास्तविक पहाता मोठ्या पदावर गेलेली माणसं आपला पाच मिनिटसुद्धा वेळ फुकट द्यायला कुणी तयार नाही पण प्रत्येक महिना स्वतः पंतप्रधान अर्धा तास या साऱ्या उपक्रमासाठी स्वतंत्र काढून मनकी बात करतात. मनकी बातचा अर्थ आपण जर पाहिला तर असा काढायला हरकत नाही. जनतेच्या मनात सुरू असलेल्या भावना त्या ओळखायच्या, त्यांच्याशी संवाद करायचा, त्यांच्याकडून काही देश चालवण्यासाठी प्रेरणा घेता येईल का ? काही शिकता येईल का ? असे अनेक मनभावना पुढे येवु शकतात. पंतप्रधानाचा फोन एखाद्या गावात येणं ती बातमी त्या जिल्ह्यात त्या राज्यात पसरणं. समाज जीवनावर आदर्श निर्माण करणारे





उपक्रम जर देशाचा कारभार करणाऱ्यांनी चालवला तर एक सुसंस्कृत समाजाची निर्मिती होवु शकते. पंतप्रधानाची मनकी बात हा विषय राष्ट्रीय पातळीवरचा असला तरी गावच्या सरपंचाला देखील गावचा गाडा चालवताना आपण चार लोकांच्या सोबत संवाद करून कारभार केला तर सकारात्मक सद्गुणांची पेरणी होवु शकते हा विचार मनकी बात उपक्रमातून पुढाऱ्यांच्या मनात निश्चित आला. आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांनी इंचभर जागादेखील चीन, पाकिस्तान शत्रु राष्ट्राला मिळवुन दिली नाही. तर त्यांच्याशी थेट मनकी बातमधुन साधलेला संवाद हा कुठंतरी कौतुकाची पाठ थोपटणारा दिसेल. देशातील युवा पिढी आत्मनिर्भर बनली पाहिजे. एखाद्या युवकांनी तंत्रज्ञानामध्ये योगदान देताना हेलिकॉप्टर बांधणी असेल किंवा एखादा आगळावेगळा प्रयोग केला असेल तर त्याची दखल मनकी बातमध्ये घेतली. देशातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातुन स्वयंसिद्धता उपक्रम चालु करून वेगवेगळे प्रयोग त्याचीही दखल उपक्रमात पहायला मिळाली. सांगायचं तात्पर्य मनकी बात हा विषय आता खरंच देशवासियांच्या मनातील भाव होवुन बसला आहे. म्हणून शंभरावा उपक्रम साजरा होताना कालच्या 30 तारखेला देशातील लोक मिळेल तिथे जावून मनकी बात ऐकायला समोर बसले होते. पंतप्रधान पदी विराजमान झालेल्या नेतृत्वाने सामाजिक उत्थानासाठी भव्यदिव्य उपक्रम चालु केला तर विरोधकांनी देखील त्याचं कौतुक करायला हवं होतं पण अलीकडे काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले आणि खा.संजय राऊत यांनी अनेकदा मनकी बात उपक्रमाची चेष्टा करत माध्यमांच्या समोरसुद्धा अवहेलना केली. वास्तविक पहाता असा पोरकटपणा करणं म्हणजे देशातील 142 कोटी लोकांच्या भावनेचा अनादर करणं त्याहुन अधिक चेष्टा करणं असंच होय. पटोले, राऊत यांना केवळ राजकारणासाठी राजकारण करायचं आहे. समाजकारणाचा त्यांचा पत्ता नाही. आरोप-प्रत्यारोप करणं आणि मोदीजींच्या नावाने रोज शिमगा करणं याशिवाय दुसरं काही डोळ्यासमोर दिसत नाही. खरं तर नरेंद्र मोदी यांना विरोधक शिव्या शाप देतात तेवढं त्यांच्या बाजुने अनुकुलता निर्माण होते. मध्यंतरी काँग्रेस राष्ट्रीय अध्यक्ष खर्गेंनी तर मोदींना सापाची भुमिका दिली. मोदी तेरी कब्र खोदेगी या शब्दांत एका काँग्रेस नेत्याने धमकीवजा शब्दाचा वापर केला होता. तसं पाहता कावळ्याच्या शापाने ढोर मरत नाहीत ही म्हण आजही ग्रामीण भागात रूढ आहे. तसं पटोले, राऊत यांनी कितीही टवाळखोरी केली तरीही 2024 नंतर पुन्हा नरेंद्र मोदी याचि देहि, याचि डोळा त्यांना बघावे लागणार. कारण हा देश काँग्रेसनं अनेक वर्षे राज्य केलेलं आहे. प्रस्थापितांचं राजकारण आणि घराणेशाहीला जपण्याचं काम काँग्रेसनं केलं पण आता या देशात ना घराणेशाही ना प्रस्थापिताचं राजकारण सामान्य माणसाच्या हातात देश कारभाराची सुत्रं देण्याचं पवित्र कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टी संकल्पनेतुन पहायला मिळतं. त्यामुळे अशा बिनडोकांनी कितीही मोदींची निंदा नालस्ती केली, आरोप-प्रत्यारोप केले तरीही देशातील सामान्य लोकांचा विश्वास ते हिरावुन घेवु शकत नाहीत. कारण सबका साथ-सबका विकास हे सुत्र मागच्या नऊ वर्षापासुन देशवासियांच्या गळी उतरलेलं आहे. कुणी काही म्हणा किंवा कुठल्याही शब्दांत टिका करा मोदीबिना हम अधुरे मोदी है तो नामुमकीन एवढी खात्री देशातील 142 कोटी लोकांना पटलेली आहे. पण असे नेते मनकी बातचा विरोध करतात. त्यांची अवहेलना करतात. कदाचित येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा आरोप करायलासुद्धा ही मंडळी दिसणार नाही एवढा बंदोबस्त नक्कीच सामान्य मतदारांच्या पाठबळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी केल्याशिवाय रहाणार नाहीत.

# खलिस्तानला समर्थन देण्याची कॅनडाची निषेधार्ह भूमिका



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**वारीस दे पंजाब या संघटनेचा म्होरक्या अमृतपाल सिंग याला अटक केल्यानंतर खलिस्तान समर्थकांच्या कारवायांना ब्रेक लागेल अशी अटकळ बांधली जात आहे. भारतात तरी ही अटकळ खरी ठरत आहे. अमृतपाल सिंगच्या अटकेनंतर पंजाबमध्ये त्याचे तीव्र प्रतिसाद उमटतील अशी भीती व्यक्त होत होती ती निरर्थक ठरली. अमृतपाल सिंग च्या अटकेनंतर पंजाबमध्ये मोठा हिंसाचार झाला नाही याबद्दल पंजाब पोलीस आणि केंद्र सरकारचे अभिनंदनच करायला हवे. आज पंजाबमध्ये तणावपूर्ण का होईना पण शांतता आहे. अमृतपाल सिंग हा पंजाब दे वारीस या संघटनेचा म्होरक्या असून तो खलिस्तान समर्थक आहे. खलिस्तान ही अतिरेकी संघटना असून शीख धर्मीयांसाठी स्वतंत्र खलिस्तान राष्ट्र निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी या संघटनेने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या घडवली होती.**

इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर या संघटनेवर भारतात बंदी घालण्यात आली होती आजही ही बंदी कायम आहे. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर या संघटनेच्या देशविरोधी कारवाया थांबल्या होत्या मात्र मागील काही वर्षात खलिस्तान समर्थक पुन्हा डोके वर काढू लागले आहेत. अर्थात या संघटनेला पाकिस्तानच्या आयएसआय चा पाठिंबा आहे हे सांगायला कोणत्या तज्ज्ञाची गरज नाही. पाकिस्तान सोबतच आणखी एक देश खलिस्तानचे उघड समर्थन करतो आणि त्यांना पाठबळ देतो तो म्हणजे कॅनडा. हो कॅनडा या देशाने खलिस्तानला कायम समर्थन दिले आहे. १९८० च्या दशकात जेंव्हा खलिस्तान चळवळ जोमात होती तेंव्हा कॅनडामधूनच त्यांना आर्थिक रसद पुरवली जात होती. आज ४० वर्षानंतही परिस्थिती बदलली नाही. आजही कॅनडा सरकार खलिस्तानचे उघड समर्थन करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो हे खुलेआम खलिस्तानवादयांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात खलिस्तान समर्थक मंत्र्यांचा समावेश आहे. अमृतपाल सिंगच्या अटकेनंतर विदेशातील खलिस्तान समर्थक कॅनडामध्ये एकवटले आहेत. कॅनडा मध्ये भारतविरोधी कारवाया पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रुडो यांना भारतविरोधी खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली परंतु ट्रुडो यांनी पंतप्रधानांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. एव्हढेच नाही तर टोरोंटो आणि ओंटोरिया या शहरात खालसा स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली. तिथे त्यांचे खलिस्तानचा ध्वज देऊन स्वागत करण्यात आले. ट्रुडो यांच्या या भूमिकेचा भारत सरकारने तीव्र शब्दात निषेध करायला हवा. ट्रुडो यांची खलिस्तानवाद्यांना समर्थन देण्याची फुटीरतावादी भूमिका म्हणजे भारतविरोधी शत्रुत्वाची भावना आहे. वास्तविक भारताने कॅनडासोबत कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले आहे. भारत कॅनडाला मित्रच मानतो मात्र कॅनडा फुटीरतावाद्यांना पाठबळ देत आहे त्यामुळे भारताने याची गंभीरपणे नोंद घ्यायला हवी. फुटीरतावाद्यांना पाठबळ देणारे आमचे मित्र होऊ शकत नाही असे भारताने कॅनडाला ठणकावून सांगायला हवे इतकेच नाही तर हा आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील हा मुद्दा उचलून धरायला हवा.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# भगवान गौतम बुद्ध यांची भव्य मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारतीय बौध्द धम्म जागृती अभियान व बोल मूक नायक पार्टी, जि.धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने मा.रत्नशील सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली बुध्द जयंती निमित्त मंगलमय वातावरणात मिरवणुक संपन्न झाली. भारतीय बौध्द धम्म जागृती अभियान धुळे जिल्हा शाखा अंतर्गत 5 मे रोजी मध्यवर्ती बुध्द जयंती उत्सव समिती धुळे चे अध्यक्ष रत्नशील सोनवणे यांच्या हस्ते मेणबत्ती, अगरबत्ती, पुष्पहार वाहून व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पमाळ अर्पण करुन बौध्द धम्मगुरु अंगुलीमान औरंगाबाद यांनी त्रिशरण पंचशील दिले व अभिवादन करण्यात आले. मिरवणुकीची सुरुवात भीम नगर साक्री रोड येथून आण्णासाहेब लळींगकर चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती पुतळ्याशेजारी येऊन संपन्न झाली. भगवान बुध्द यांची जयंती मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रथम भगवान बुध्द यांच्या प्रतिमेचे नितीन मोरे- अकौंटंट ऑफिसर, डॉ. बापूसाहेब सैंदाणे, डॉ.महेश अहिरराव सर, डॉ. हिरामण मोरे, डॉ. महेश मोरे, रावसाहेब पंकज वाघ धुळे, प्रा. जी. जी. ढगे सर, रावसाहेब सुरेंद्र शेणगे, संजय चव्हाण, अशोकबाबा सोनकांबळे ( सामाजिक कार्यकर्ता ), दीपक खैरनार ( अध्यक्ष- बहुजन विद्रोही पत्रकार संघ ), बौध्द धम्मगुरु अंगुलीमा औरंगाबाद यांनी बौध्द धम्मावर प्रवचन दिले. या कार्यक्रमाला आलेल्या मान्यवरांनी बुध्दाच्या जीवनावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महिला, पुरुष, लहान मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय मोंढे, विजय मोंढे, सनी मगर, जय मोंढे, कल्पेश मोंढे, मयुर मोंढे, प्रज्ञा गरुड, मिना खैरनार, रीना खैरनार, योगिता मोंढे, बुध्दज्योती सोनवणे, सुरेश गायकवाड, अमृत घोडके यांनी परिश्रम घेतले.



# योगेश ईशी यांच्या हस्ते बुद्धविहाराचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील साक्री रोडवरील राजरत्न हाऊसिंग सोसायटी तील बुद्ध पौर्णिमेचे अवचित्त साधून धम्माची चळवळ गतिमान व्हावी यासाठी श्रावस्ती बौद्ध विहाराचे भूमिपूजन सोहळा योगेशआप्पा ईशी व मनीषाताई ईशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रभागातील विविध प्रतिष्ठित नागरिक, धम्मबंधू- भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# शेट्टी बारसू लढ्याला पाठिंबा द्यायला जाणारच

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** शेतकऱ्यांच्या न्याय लढ्यासाठी कोणत्याही परिस्थितीत राजू शेट्टी रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथे जाणार आहेत. यामध्ये मनाई आदेश करू नये. अन्यथा आम्हाला उच्च न्यायालयात दाद मागावी लागेल, अशी मागणी राजू शेट्टी यांच्यामार्फत ॲड. असिम सरोदे यांनी रत्नागिरी जिल्हाधिकारी यांना केली आहे.राजू शेट्टी यांना रत्नागिरी जिल्हाधिकारी यांनी बारसू येथे भेट देण्यास मनाई आदेश केला आहे. सोशल मीडियावरदेखील कोणत्याही प्रकारचे पोस्ट करण्यासदेखील मनाई केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या नोटीसला राजू शेट्टी यांनी उत्तर पाठवले आहे. या नोटीसमध्ये म्हटले आहे की, राजू शेट्टी यांनी चळवळीमध्ये तसेच सक्रिय राजकारणात कधीच असंसदीय शब्दांचा वापर केला नाही. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी ते नेहमीच लढा देत आले आहेत. त्यांना सोशल मीडियावरदेखील प्रतिक्रिया देण्यास मनाई केली आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या अधिसभेवर डॉ. मिलिंद देशपांडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** १ ) डॉ. मिलिंद देशपांडे शल्य चिकित्सक, १९८२ पासून संभाजीनगर येथे सुमनांजली



रुग्णालय या संस्थेच्या माध्यमातून रुग्णसेवा करत आहेत. २ ) मराठवाड्यातील अनेक सेवाभावी प्रकल्पांमध्ये त्यांचा सहभाग राहिलेला आहे. ३ ) यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद आणि अधी सभे ( सिनेट ) वर काम केलेले आहे. ४ ) कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षा या क्षेत्रात मागील २० वर्षांपासून त्यांचे उल्लेखनीय योगदान राहिलेले आहे. ५ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. प्रमोद येवले यांनी त्यांच्या नावाची शिफारस केली आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकच्या कुलगुरू मा. डॉ. माधुरी कानिटकर ( ले. जन. निवृत्त ) यांनी या संदर्भातील पत्रक निर्गमित केले आहे. सदर नियुक्ती बद्दल डॉ. मिलिंद देशपांडे यांनी दोन्ही कुलगुरूंचे आभार व्यक्त केले.



# अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना रडवले

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** राज्यात गेल्या आठवडाभरापासून अवकाळी पाऊस व गारपीट होत आहे. पैठण तालुक्यात पुन्हा अवकाळी पावसाचा धुमाकूळ सुरूच आहे. आज देखील पाऊस झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी मेटाकुटीला आला असुन पावसामुळे कांदा मार्केटमध्ये दर घसरला असून पैठण बाजार समितीमध्ये शुक्रवारी २ ते ७ रूपयांच्या दराने खरेदी झाल्याने अवकाळी पावसाने पुन्हा शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले. मंगळवारी सायंकाळी पुन्हा वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शहरासह जिल्ह्याला झोडपले. या पावसामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांचे जनजीवन विस्कळित झाले आहे. सध्या उन्हाळा सुरू असून या उन्हाळ्यात लग्नसराई सुरू आहे. लग्न घरच्यांची या अवकाळी पावसामुळे मोठी धावपळ उडत आहे. जवळपास दहा दिवसांपासून हा पाऊस औरंगाबाद जिल्ह्यात बरसत आहे. या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे नुकसान तर झालेच. परंतु सर्वसामान्यांचे जनजीवन देखील विस्कळीत झाले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# तथागत गौतम बुद्ध मार्ग दाता, मोक्ष दाता नव्हे..



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**तथागत गौतम बुद्ध यांची जयंती अर्थात बुद्ध पौर्णिमा संपूर्ण विश्वामध्ये आनंदी व उत्साही वातावरणात साजरी होत आहे. तथागत बुद्ध हे अखिल मानव जातीला आपले आचरण शुद्ध ठेवून, आदर्श जीवन जगण्याचा आदर्श मार्ग देतात. तथागत गौतम बुद्धांचे विचार हे कोणत्याही मानवावर बंधनकारक नाहीत, परंतु तथागत गौतम बुद्धांच्या विचाराने कोणताही मानव गेला तर त्या मानवाचे सर्वांगीण न कल्याण होतेच. तथागत गौतम बुद्धांचे विचार हे विज्ञानवादी, समतावादी, न्यायवादी आणि विशेष म्हणजे आधुनिक आहेत.**

अडीच हजार वर्षांपूर्वी मांडलेल्या विचाराची गरज आजही जशाला तशी मानवाला आवश्यक आहे. तथागत गौतम बुद्ध यांचे विचार मानवाला तारुण, आजच्या जीवनामध्ये सुख, समृद्धी व शांती निर्माण करणारे आहेत. तथागत गौतम बुद्ध हे केवळ उपासना पूजाअर्चा करण्याचे माध्यम नाही. तर जीवन जगण्याचा प्रत्येक मानवाला साजेसा महामार्ग निर्माण करणारे, व त्या मार्गाने जाण्याचे संकेत देऊन जीवनातील दुःख, अहंकार, द्वेष तिरस्कार सर्व गुणांना बाजूला सारून गुणी व संपन्न जीवन जगण्याचा मार्ग बहाल करणारे जगातील एकमेव महामानव म्हणजे तथागत गौतम बुद्ध होत. तथागत गौतम बुद्ध, समता, बंधुता, न्याय, व स्वातंत्र्यवर आधारित समाज व्यवस्था निर्माण करून, अंधश्रद्धा कर्मकांड यांना लाथाडून मानवाच्या वास्तविक विकासासाठी प्रयत्न करण्याची शिकवण तथागत बुद्ध देतात. कोणतेही यश मिळवायचे असेल तर कोणाचीही उपासना आराधना करून यश मिळत नाही. तर कष्ट करून ते यश आपल्याला मिळवावे लागते, असा कर्म सिद्धांत तथागत गौतम बुद्धांनी येथे मांडलेला आहे. आपण जशी कर्म करत जातो त्याचं कर्माचे फळ आपल्याला मिळत असते. आणि ते इथेच मिळत असते. तथागत गौतम बुद्धांनी कोणत्याही काल्पनिक शक्ती अंधश्रद्धा, पाखंड यांना कुठेही धारा दिलेला नाही. जी वस्तू जो जीव येथे निर्माण झाला त्याचा अंत एक दिवस आहे. फरक एवढाच आहे काहींचे आयुष्यमान हे अल्प तर काहीच आयुष्यमान हे दीर्घ आहे. परंतु उदयास आलेली प्रत्येक बाब ही नष्ट होणार वास्तविक सत्य तथागत बुद्धांनी मांडलेले आहे. ज्यांना समता, बंधुता, व स्वातंत्र्य मान्य आहे. तसेच अंधश्रद्धा, पाखंड, भोंदूगिरी हे मानवासाठी घातक व मानवाला गुलाम बनवण्याचे माध्यम आहे, असे ज्या ज्या लोकांना वाटते त्या त्या लोकांचे जागतिक व आदर्श एकमेव मार्ग दाते म्हणजे तथागत गौतम बुद्ध. तथागत गौतम बुद्धांच्या विचारांनाच आपण धम्म म्हणतो आणि त्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या समूहाला संघ म्हणतो. थोडक्यात काय आदर्श जीवन जगण्याचा मार्ग दिला व जीवनातील दुःख निवारण कसे करायचे यावरती उपाय सुद्धा सुचविलेले आहेत. मानवाच्या विकासासाठी बुद्धाचे विचार हे अत्यंत प्रभावी आहेत. मग तो माणूस कोणत्याही जातीचा कोणत्याही धर्माचा असो, बुद्धाचे विचार अंगीकारले, स्वीकारले तर त्या व्यक्तीचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. आपण तथागद बुद्धांच्या पाच शिलाचा विचार केला तरी पाच शिलामधून, तथागत गौतम बुद्ध प्राणी मात्रावर दया करा, खोटे बोलू नका, चोरी करू नका, व्याभिचार करू नका, मादक पदार्थाचे सेवन करू नका, या पंचशिलेचा उपदेश देत असतात. ज्या कोणाला आपले चारित्र्य सांभाळायचे आहे व आदर्श जीवन जगायचे आहे त्यांनी या पाच शिलाचा स्वीकार केला तर त्याचे जीवन सुखमय व निष्कलंकित राहते. अनेक लोक तथागत बुद्धांचे नाव घेत नाहीत, परंतु वरील पाच शिलाचे पालन करतात, याचाच अर्थ ते लोक बुद्धाच्या विचाराचा स्वीकार करतात. हे सर्व काही योग्य असताना आजही काही गोष्टी बदलणे अत्यंत आवश्यक आहे. कारण बुद्ध काल्पनिक शक्ती किंवा अंधश्रद्धेला कुठे थारा देत नाहीत. याचाच आधार घेऊन स्वर्ग नरक संकल्पना नाकारणारे लोक मात्र



तथागत चरणी असा शब्दप्रयोग करतात. त्यावेळेस मात्र तथागतांचे चरण स्वर्गाशी संबंधित तर नाहीत ना? असा संशय येतो. कारण एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर तेथे शोकसभेमध्ये मृत व्यक्तींना बुद्ध चरणी जागा मिळो, व त्यांच्या आत्म्यास शांती देवो, बुद्ध त्यांच्या कुटुंबास दुःख सावरण्याची शक्ती देवो, या पद्धतीचा शब्दप्रयोग करून बुद्धानांच काल्पनिक बनवण्याचा प्रयत्न केला जातो. बुद्धशक्ती देत नाहीत, आणि बुद्ध शक्ती काढूनही घेत नाहीत. पण हे खरे आहे बुद्धाचा सिद्धांत जर समजून घेतला तर जगण्यासाठी आपोआप बळ मिळते. अनेक वेळा बुद्धा ब्लेस यु असा शब्दप्रयोग सुशिक्षित लोक करतात. तेव्हा अशा लोकांच्या बुद्धीची येते. कारण बुद्ध कोणालाही आशीर्वाद देत नाहीत ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. इतर लोक देवांबद्दल दाखवतात तिच श्रद्धा बुद्धाला म्हणणारे लोक देवा ऐवजी बुद्ध नावाचा वापर करून प्रकट करतात. हे थांबणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक लोक बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा असा शब्दप्रयोग करतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ते शुभ अशुभ हेच मान्य नसेल तिथे शुभेच्छा शब्द वापरण्याची गरजच का? शुभेच्छा ऐवजी मंगल कामना असा शब्दप्रयोग आपण करू शकतो. बुद्ध जयंती साजरी करताना फक्त त्रिशरण पंचशील घेऊन, धम्माबादत विचार सांगून चालणार नाही. तर बुद्धाचे विचार स्वीकारून जर जयंती साजरी होत असेल तर, बुद्ध पौर्णिमा साजरी झाल्याचे सार्थक होईल. आजही स्वतःला बुद्ध धम्माचे उपासक समजणारे लोक लग्न कार्यामध्ये हळदी खेळण्याचा कार्यक्रम करतात. लग्नामध्ये नवरा मुलगा असतो त्याला बाशिंग, टोप,कट्यार या गोष्टी परिधान करून सजवले जाते. ज्या मंगलपरिणय विधीच्या वेळी काढाव्या लागतात. आता या गोष्टी कशासाठी करायच्यात हेच अनेक लोकांना माहिती नाही. परंतु वर्षानुवर्षे चालत आलेली अंधश्रद्धा पाळली जाते. हे बुद्ध धम्माचे पालण करण्याचे लक्षण नव्हे. बर सुशिक्षित आणि नोकरदार लोकही हळदीचा कार्यक्रम करतात. हळदीच्या कार्यक्रमांमध्ये कोणतेही विज्ञान कोणताही तर्क आजच्या घडीला दिसून येत नाही. तरीही कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आणि शनिवार दिवस असेल तर अनेक बहाद्दर हळद सुद्धा लावत नाहीत. मुळात हळद लावू नये आणि जर शनिवारी हळद लावत नसाल, शनिवारी हळद लावणे टाळत असले तर एवढी मोठी अंधश्रद्धा धम्मामध्ये आहे. जे शनिवारी हळद लावू नये याच्या समर्थन करतो किंवा विशिष्ट दिवशी लग्न झालेल्या नवीन मुलीला माहेरी वा सासरी असेल पाठवू नये, असे विचार ठेवणारे धम्मामध्ये आजही अनेक लोक आहेत. हे विचार हे अंधश्रद्धा बदलून आपल्याला विज्ञानवादी विचार व धम्माचे पालन या गोष्टी करणे अत्यंत गरजेचे आहे. लग्नासोबतच इतरही अनेक अंधश्रद्धा या धर्मामध्ये शिरगाव करत आहेत. तर त्या बाजूला सारून विज्ञानवादी मार्ग स्वीकारला तरच आपण धम्माचे उपासक बनू. छोटे-मोठे बारकावे आणि वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून धम्मात चाललेली अंधश्रद्धा या बाजूला सारणे आवश्यक आहे. अनेक सुशिक्षित लोक अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा बाळगतात, त्या बंद झाल्या तरच आम्ही बुद्धाचे विचार स्वीकारले हे सिद्ध होईल.

# संत तुकारामाचे अभंग-एक चिंतन... म्हणजे अंतरीचे धावे, स्वभावे बाहेरी

आधुनिक केसरी

**संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन हा प्रा. डॉ. सुभाष बागल यांचा ग्रंथ छत्रपती संभाजीनगर येथील कैलास पब्लिकेशनकडून प्रकाशित झाला आहे. एकूण दोनशे चाळीस पानांच्यामधून येणारा हा बृहत ग्रंथ संत तुकारामांच्या अभंगावरील त्यांचं चिंतन व्यक्त करणारा आहे. ६ मे २०२३ रोजी संध्याकाळी छत्रपती संभाजीनगर मधील मराठवाडा साहित्य परिषदेमध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. त्यानिमित्ताने या ग्रंथावर टाकलेला हा प्रकाशझोत. संत तुकारामांची अभंगवाणी नव्या- जुन्या अभ्यासकांना, सांप्रदायिकांना, चिकित्सक समीक्षकांना, आणि श्रद्धाळू भाविकांना सततच नव्या नव्या संदर्भात, अभिनव परिमाणांतून, परिप्रेक्ष्यातून प्रभावित करीत खुणावताना दिसते. म्हणूनच विविधांगानी, विविधांगी दृष्टिकोनातून, पैलूमधून तिचे मूल्यांकन होत गेलेले आहे.**

संत तुकारामांचे काव्य आणि व्यक्तिमत्त्व हा सातत्याने चिंतन विषय राहत आला आहे. हे सर्व पैलू आणि दृष्टिकोन तितकेच खरे आहेत. तरीही त्या पलीकडे तुकोबांचे काव्य आणि व्यक्तिमत्व उरतेच ! परिपूर्णार्थाने समग्र तुकोबा आत्मसात केलेत वा झालेत असे कोणीच ठामपणे म्हणू शकत नाही ; कारण तुकोबा अशा एखाद्या अभ्यासकाच्या कवेत मावणारे नव्हेत ! 'तुका आकाशात एवढा' हे या अर्थाने खरे वाटते ! कोणत्याही एका दृष्टीने त्यांना गवसणी घालण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरतो ! म्हणून समग्र मराठी संत वाङ्मयात संत तुकोबांचे स्थान विलक्षण आहे ! ते 'कळस' का ठरले याचे उत्तर या सर्वात आहे. कोणी त्यांच्या काव्यातील भागवतधर्म- वारकरी पंथदृष्टीचा विचार केला ; तर कोणी त्यांच्या काव्यातील प्रतिमासृष्टीचा आणि काव्यशक्तीचा विचार केला ! कोणी त्यांच्यातील सामाजिक जाणिवेकडे लक्ष वेधले, तर कोणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संघर्षशीलता- दुधारी व्यक्तिमत्त्वाचा विचार केला. कोणी त्यांच्या भाषेचा तर कोणी कथात्मवीणेचा- उपहास- उपरोध- हास्य बहिर्मुखतेचा तर कोणी 'आनंदडोहा' चा झरा शोधला ! कोणी 'तुका म्हणे' या वचनातील मर्म तर कोणाला 'पुन्हा तुकाराम' नव्याने माणूस म्हणून- कवी म्हणून नव्हे फक्त 'असणे' पणा अस्तित्वरूपाचा शोध घ्यावा वाटला. या सर्वांनंतर 'तुकोबा' उरतोच ! म्हणून नवनवे अभ्यास पुनः पुन्हा तुकारामांच्या गाथेच्या प्रेमात पडतात- स्वतः ला त्यात पडताळून पाहतात. आपला आपणच शोध घेतात. मुठीत गवसले का ? धरता आले का ? हे पाहतात. तसाच काहीसा प्रयत्न प्रा. डॉ. सुभाष बागल यांनी केला आहे. जवळजवळ एकोणावीस प्रकरणातून तुकोबांच्या समग्रगाथेचे आकलन त्यांनी मांडले आहे. संत तुकारामांची गाथा हा त्यांच्या चिंतनाचा विषय झाला. स्वतंत्र चिंतन करून त्यावर आपल्या विश्लेषणाची मोहर त्यांनी उठविली आहे. प्रास्ताविकाच्या 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' या प्रकरणापासून ते संत तुकारामांची अभंगलेखनामागील भूमिका, अभंगलेखनामागील प्रेरणा, मंगलाचरण, कीर्तन भक्ती, विरहिणी, गौळणी, नाट, भूपाळी, हरिपाठ, शाक्तपर अभंग, आरती अशा विविधांगी आविष्कारांची रूपे न्याहाळत त्यावर त्यांनी आपले भाष्य केले आहे. त्यातील भक्तीभाव, उत्कटता, ईश्वरप्रणिधान, समाज प्रबोधन याची चर्चा करून संत तुकारामांनी रेखाटलेली शब्दचित्रे, त्यांचे दृष्टांत, प्रतिमा, प्रतिमाने, सुभाषिते या भाषा आणि काव्य विचारांची त्यांनी चिकित्सा केली आहे. एकूणच त्यांच्या गाथेचा हा समग्र आकलनाविष्कार येथे सादर केला आहे. यामध्ये डॉ. बागल यांची भूमिका नम्र विश्लेषकाची, विनम्र आस्वादकाची आणि एका समर्पित चिंतकाची आहे ! तुकोबांच्या एकूणच काव्यविशेषांनी ते भारून गेले आहेत ! त्यांनी आपली मते काही ठिकाणी ठामपणे अभिव्यक्त !

संत तुकारामांचे काव्य हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य अविष्कार आहे. व्यक्तिमत्व त्यांच्या अभंगातून शब्द शब्दातून प्रकटते ! संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांची यासंदर्भात तुलना केली तर हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. खरे तर 'As the man is, so is his style' 'जसा कवी तशी शैली' हे विधान शैलीशास्त्रीय समीक्षा करतात. परंतु संत ज्ञानेश्वर हे आपले व्यक्तिमत्व उघड होऊ देत नाहीत ! त्यांची 'आत्मविलोपनात्मक' शैली असल्याने ते व्यक्तिमत्त्वाचे प्रकटीकरण करत नाहीत ! त्यांची वृत्ती अधिकाधिक अंतःर्मुख आहे. अंतःर्मुखवृत्तीने ते काव्य लिहितात ! त्यामुळे समाजाबद्दलच्या प्रतिक्रिया त्यांच्या काव्यातून उमटत नाहीत ! संत तुकारामांच्या बाबतीत मात्र त्यांचे हे काव्य 'संस्कृतिटीके' च्या स्वरूपाचे बनते. इंग्रजी कवी मेथ्यु अर्नोल्ड म्हणतो त्याप्रमाणे " लिटरेचर मिरर टू नेचर" किंवा " लिटरेचर इज द क्रिटीझम ऑफ लाईफ" . हे समाजभाष्य बनते ! तुकाराम हे समाजशील कवी आहेत. त्यांना केवळ 'बहिःर्मुख' म्हणता येणार नाही. कारण केवळ बहिःर्मुख वृत्तीने त्यांनी काव्य लिहिले असते तर ते

**पुस्तक परीक्षण- डॉ.विद्यासागर पाटंगणकर**

उथळ, प्रासंगिक वा तात्कालीक झाले असते. त्यात समाजचिंतन येते. म्हणजेच ते अंतःर्मुखवृत्तीतून आलेले आहे. या दृष्टिकोनातून प्रा. डॉ. बागल यांनी हा मुद्दा अधोरेखित करताना तुकोबांच्या 'अनुभव घेणे आणि तो व्यक्त करणे' या काव्यात्मक क्षमतेचा विचार केला आहे. तुकोबा अत्यंत संवेदनाशीलपणे अनुभव ग्रहण करतात. अत्यंत हळुवार, कलात्मक कोवळीकतेने अनुभव घेतात. पण अत्यंत परखडपणे, कठोरपणे, कणखरपणे तो व्यक्त करतात. पण याचा अर्थ त्यांच्यात कलात्मकपणा बाधित होतो, असे मात्र म्हणता येणार नाही. तुकारामांची अनुभव घेणे आणि तो व्यक्त करणे यातील द्वंद्वात्मकता लक्षात घेतली पाहिजे. तुकारामांची सगळी भाषा द्वंद्वात्मक आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच हे दुहेरीपण आहे. अशा दुपदरी धाग्यांनी त्यांची कविता आणि व्यक्तिमत्व विणलेले दिसते. त्याची मांडणी डॉ. बागल यांच्या या चिंतनातून येते. संत तुकारामांचे 'संतत्व' हे संघर्षातून सिद्ध झालेले, उजळून निघालेले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. संत तुकारामांचे 'माणूस असणे ही त्यांची अपरिहार्यता आहे. संतापलेल्या माणसाचे उद्‌गार तुकोबा बोलतात. तेव्हा ते सामान्य माणसाच्या पातळीवर येऊन व्यक्त होतात. आणि हे व्यक्त होणे अपरिहार्य असते. हे समजले म्हणजे त्यांच्यातील 'संतत्व' या सामान्याच्या परिपाक कसा ठरतोय समजते ! संतत्व हे सहजी मिळालेले नसून, ते मिरवण्यासाठी नसून पोळलेल्या अनुभवातून उजळून- पाजळून निघालेले सुवर्ण आहे. ही बाब अधिक महत्त्वाची वाटते. डॉ. बागल यांनी तुकोबांच्या अभंगवाणीचे यश सांगताना समाजचिंतन, समाजदर्शनकार, संस्कृतिटिकाकार व उपदेशक या भूमिका एका अनुभविकाच्या भूमिकेत विसर्जित झाल्या आहेत हा काढलेला निष्कर्ष त्यांच्या चिंतनाची योग्य दिशा प्रकट करतो. तुकोबा एक अनुभविक संत आहेत. त्यांची समाज माणसाशी एक तार जोडलेली असल्याने ते ' आम्ही' च्या भाषेत बोलतात. त्यांचे समाजाशी जुळलेले नाते त्यातून प्रकटते. 'आम्ही' हीच त्यांची अनुभूती प्रेरणा आहे. त्यातून त्यांची कविता समाजाशी एकात्मक नाते सांधते. तुकोबांचा 'मी' 'आम्ही' मध्ये विसर्जित झाला आहे. ते समाजाच्या स्वरातच बोलतात. हा स्वर अर्थातच 'लाऊड' आहे. व्यक्तित्वविरहित आहे. तो समाजानुभव आहे. विचारानुभव आहे. मात्र ही केवळ बहिःर्मुखता नाही. तर बहिःर्मुख अनुभवाला आंतरिक प्रेरणेच्या ओलीत बुडवल्यामुळे आलेली अंतः मुखता आहे. संत तुकारामांच्या गाथेत अभंग शैलीतून विभिन्न काव्यप्रकार तुकोबा हा तळताना दिसतात. त्यात भावकविता, नाट्यकाव्य, कथाकाव्य, हास्य विनोदाची झलक असणारी वस्तुनिष्ठरचना हे प्रकार येतात. निखळ भावकविता तुकोबा जशी लिहितात तशी नाट्यात्मक रचनाही करतात. गौळणी- विरहिणी या रचना भावनाट्य प्रगट करणाऱ्या आहेत. बाळक्रीडेतून कृष्णाची बाळलीला कथात्मपणे येत राहते. यातही दामयमकसारखा प्रकार ते करतात. मानवी स्वभावातील विरोध, अंतर्विरोध, लटकेपणा ते सहजपणे दाखवतात.

या ग्रंथात डॉ. बागल यांनी मंगलाचरणाचे वा रुपाची अभंग यावर चिंतन मांडले आहे. त्यासाठी 'सुंदर ते ध्यान' हा सर्वश्रुत लोकप्रिय अभंग त्यांनी चिंतनासाठी घेतला आहे. त्याची चिंतन करताना बाह्यमूर्ती,




अंतरंगातील मूर्ती, ध्यान याचा विचार त्यांनी अत्यंत तार्किक पद्धतीने केला आहे.

प्रा. डॉ. सुभाष बागल यांनी संत तुकारामांच्या गाथेतील वैविध्यपूर्ण अभंगासंबंधी केलेले हे चिंतन लक्षणीय आहे. अर्थात त्यांनी सर्वच अभंगाचा विचार यात केलेला नाही. उदाहरणार्थ काही प्रसंगोपात्त, प्रासंगिक अभंग. परंतु प्रमुख विभागांच्या आधारे आपले चिंतन, मनन , त्यावरील विवेचन आणि विवरण त्यांनी सादर केले आहे. संत तुकारामांच्या काव्याची वैशिष्ट्ये, त्यातील गुणवत्ता या निमित्ताने त्यांनी अधोरेखित केली आहे.

" अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी
आवरीता परि आवरेना "

या उस्फूर्ततेतून, आत्मानुभवाच्या आणि सत्यत्वाच्या कसोटीतून त्यांचा अभंग साक्षात होतो. त्यामागे जसा भक्तीभाव आहे तसाच आत्मसंवाद- जनसंवाद- विठ्ठल संवादही आहे. म्हणूनच त्यांचा अभंग सशक्त रूपात भिन्नभिन्न परिमाणातून पाहता येतो. डॉ. बागल यांनी संत तुकारामांचा भक्तीभाव, समाजप्रबोधन, उत्कटता, काव्यात्मकता, संतपण आणि व्यक्त होण्यातील रांगडेपण इत्यादी अंगाने त्यांचा अभ्यास, त्यांचे चिंतन 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन' या ग्रंथातून सादर केला आहे.

या ग्रंथाचे स्वागत सर्व रसिक, अभ्यासक, चिंतक, भाविक करतील असा मला विश्वास वाटतो. डॉ. बागल यांच्या पुढील लेखनास हार्दिक शुभेच्छा देऊन थांबतो. धन्यवाद.

**( 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन'**
**लेखक – डॉ. सुभाष बागल**
**प्रकाशक –कैलास पब्लिकेशन्स, छत्रपती संभाजीनगर**
**पृष्ठे – २४०, किंमत ३५० रूपये)**

# संविधान म्हणजे काय ?




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र. : 7276526268

आधुनिक केसरी

**मनुष्य हा 'समाजशील प्राणी' आहे. सुरुवातीपासूनच तो 'समूहात' राहत आलेला आहे. कितीतरी प्रकारच्या समूहांमध्ये तो सतत वावरत असतो. सुरुवात होते ती स्वतःच्या परिवारापासून! दैनंदिन जीवनात तर आणखी कितीतरी प्रकारचे 'समुह' आपण बघत असतो. उदा. कुटुंब, मित्रपरिवार... इत्यादी. माणसाचे हे सामाजिक जीवन काही एकाएकी अस्तित्वात आलेले नाही, तर हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून ते आकारास आलेले आहे. अशा प्रकारच्या विविध समूहांमध्ये राहण्यातच व्यक्तीचे 'सर्वांगीण कल्याण' असते. अशा समूहात राहील्यामुळे व्यक्तीला एक ओळख मिळते. दैनंदिन मूलभूत गरजा उदा. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य.. इ. भागवल्या जातात.**

स्थैर्य तसेच सुरक्षितता मिळते. व्यक्तींमध्ये असलेल्या सुप्त क्षमता आणि गुणांचा विकास समुह जिवनात होतो. शिवाय बऱ्या-वाईट प्रसंगी भावनिक व मानसिक आधार देखील मिळतो. परंतु तरीही समूहातील सर्वच व्यक्तींचे विचार, मते, कृती ह्या एकसारख्या कधीच नसतात. आणि त्यामुळे काही वेळा तणावाचे वातावरण देखील तयार होते. हे तणाव नियंत्रणात राहून समूह जीवन सुरळीत रहावे यासाठी समूहातील काही 'जाणकार व्यक्ती' एकत्र येऊन काही 'नियम' बनवतात. व्यक्ती आणि समूह यांच्या तणावपूर्ण नात्यात त्यामुळे एक प्रकारचे 'संतुलन' निर्माण होते. अशा प्रयत्नपूर्वक संतुलन निर्माण करणाऱ्या नियमांच्या एकत्रीकरणालाच ढोबळमानाने त्या समूहाचे 'संविधान' असे म्हणता येईल. अशा प्रकारचे काहीच नियम बनवण्यात आले नाहीत, तर कोणताही समूह सुसूत्रपणे वावरू शकणार नाही. असे कुठलेही नियम नसतील तर त्यामुळे निर्माण झालेली अनियंत्रितता अनागोंदीला कारणीभूत ठरून त्या समूहाच्या विनाशाचे कारण बनेल. बदलत्या काळानुसार समुहाची व्याप्ती देखील वाढत गेली. अनेक कुटुंबे एकत्र येऊन गावांची निर्मिती झाली. त्या गावांच्या स्थान निश्चितीच्या सोयीसाठी अनेक जवळपासच्या गावांचा मिळून एक 'तालुका' तयार झाला. अनेक तालुके मिळून 'जिल्हा' आणि अनेक जिल्ह्यांच्या एकत्रीकरणातून 'राज्य' निर्माण झाले. अनेक राज्ये आपल्या सोयीच्या दृष्टीने एकत्रित आली आणि आधुनिक काळातला सर्वात मोठा आणि महत्त्वाचा समुह निर्माण झाला आणि तो म्हणजे 'राष्ट्र'. ज्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबात एक कुटुंबप्रमुख असतो, त्याप्रमाणे प्रत्येक स्वरूपाच्या समूहात अशी एखादी व्यवस्था असते, जी त्या समूहातील व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध आणि व्यवहार सुरळीत व्हावेत यासाठी प्रयत्न करत असते. त्या व्यवस्थेला आपण त्या समूहाची 'शासनव्यवस्था' म्हणतो. अशा व्यवस्थेशिवाय समुहाचे दैनंदिन व्यवहार होऊ शकत नाही. समूहाचे प्रश्न सोडविण्यासाठी, समूहाला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी, या शासन व्यवस्थेला समूहानेच काही विशेष अधिकार दिलेले असतात. आधुनिक काळातला सर्वात मोठा आणि महत्त्वाचा समुह असलेल्या 'राष्ट्र' या समुहातील नागरिक जेव्हा शासन व्यवस्थेकडे आपल्या अडीअडचणी सोडविण्यासंदर्भात एखादी मागणी करत असतात, तेव्हा खरं म्हणजे त्या शासनव्यवस्थेची 'अधिमान्यता' निश्चित होत असते. त्याचा अर्थ त्या शासन व्यवस्थेकडून शासित होणे ते मान्य करत असतात. अशा शासन व्यवस्थेकडून नागरिक जेवढ्या जास्त अपेक्षा व्यक्त करतात, तेवढी ती व्यवस्था अधिक मजबूत होत जाते. परंतु त्यामुळे अशी शासनव्यवस्था 'अनियंत्रित' आणि 'त्रासदायक' बनण्याचा धोकाही निर्माण होऊ शकतो. राष्ट्रातील नागरिकांचे हक्क, अधिकार



भाग - १

आणि स्वातंत्र्य यांबाबतची जबाबदारी पार पाडण्यासाठी जरी त्या शासनव्यवस्थेची अधिमान्यता निर्माण होणे गरजेचे असले तरी त्यातून ती शासन व्यवस्था अनियंत्रित आणि त्रासदायक बनू नये, याची काळजी घेणे देखील आवश्यक असते. नेमकी हीच काळजी घेण्याचे काम त्या राष्ट्रातील जाणकारांनी एकत्रित येऊन बनवलेले नियम घेत असतात. या नियमांच्या एकत्रित स्वरूपालाच आपण 'संविधान' असे म्हणतो. संविधान एका बाजूला त्या शासनव्यवस्थेची अधिमान्यता निश्चित करते, तर दुसऱ्या बाजूला ती अनियंत्रित व नागरिकांचे हक्क आणि अधिकार हिरावून घेणारी बनणार नाही, याची देखील काळजी घेते. थोडक्यात कोणत्याही देशाद्वारे जाणकारांच्या मदतीने अशी काही नियमावली तयार केली जाते, की ज्यामुळे देशाचा कारभार सुसूत्रपणे आणि सुरळीत चालतो. त्या नियमांच्या एकत्रीकरणाला त्या देशाचे 'संविधान' असे म्हटले जाते. म्हणजेच संविधान हे देशाचे एक असे कायदेशीर लिखित दस्तऐवज असते, ज्यात त्या देशाच्या कारभारासंदर्भातले सर्व नियम व तरतुदी एकत्रित व सुसूत्रपणे नमूद केलेल्या असतात. संविधानातील तरतुदींनुसारच त्या देशाचा राज्यकारभार करण्याचे बंधन तेथील शासनावर असते. संविधानानुसार राज्यकारभार करण्याचे तत्व जगातील बहुतेक सर्वच देशांनी स्वीकारलेले आहे. असे असले तरी जगातील प्रत्येक देशाच्या संविधानाचे स्वरूप हे त्या देशाचा इतिहास, समाजरचना, संस्कृती, परंपरा, तेथील गरजा व उद्दिष्टांनुसार वेगवेगळे असते.

'संविधान' हे देशातील कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ या प्रमुख बाबींची स्थापना करते. त्यांच्या अधिकारांची निश्चिती करते, त्यांच्या कर्तव्यांची निश्चिती करते. तसेच त्यांचे परस्पर आणि जनतेसोबतचे संबंध देखील विनियमित करते. संविधान त्याच्या निर्माणकर्त्यांच्या आदर्शांचा, स्वप्नांचा आणि मुल्यांचा आरसा असतो.

संविधान हा देशाचा 'मूलभूत कायदा' असतो. गरजेनुसार वेळोवेळी बनवण्यात येणारे इतर कायदे हे देखील त्या देशातील संविधानात असलेल्या मुळ कायद्यांच्या अनुरुपच बनवण्यात आलेले असतात. वरील विवेचनावरून आपल्या लक्षात आलेच असेल की, प्रत्येक देशाला संविधानाची नितांत आवश्यकता असते. संविधानामुळेच त्या देशातील शासन नियमांच्या चौकटीत राहून राज्यकारभार करते. त्यामुळे शासनाकडून सत्तेचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमी असते. देशातील नागरिकांचे मुलभूत हक्क आणि अधिकार सुरक्षित राहतात. संविधानामुळेच सत्तेचा गैरवापर व मनमानी कारभार न होता देशात कायद्याचे राज्य प्रस्थापित होते. त्यामुळे देशातील नागरिकांचा शासनव्यवस्थेवरील विश्वास वाढतो. या विश्वासातूनच लोकशाही व्यवस्था अधिक मजबूत होत जाते.

# तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांना समजून घेताना

आधुनिक केसरी

*(मागील अंकावरून)*

आनंदाने जगावे वाटते, जितके चांगले आपल्याला इतरांना देता येतील तितके द्यावे असे आतून वाटते, मनातील कटुता संपते, नित्य प्रसन्न, ताजेतवाने वाटते. वैज्ञानिक दृष्टीकोन अंगी बाळगला जातो. तथागतांचे विचार समजून घेत असताना मला वाटू लागले, मी आतापर्यंत आखून दिलेलं आयुष्यच जगत आले होते. बुद्ध विचारांमुळे मी मुक्त झाले, माझंही अस्तित्व आहे, हे ओळखू लागले. या मुक्याप्राण्यांवर प्रेम करू लागले. दैवीगोष्टी अजिबात मानत नाही, चमत्काराला महत्व देत नाही. ज्या गोष्टीत कार्यकारणभाव आहे, वैज्ञानिक कारण आहे त्याच गोष्टींचा स्विकार करू लागले. या अस्वस्थ जीवनाला तथागत गौतमामुळे स्थिरता प्राप्त झाली. वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवून आयुष्याला सुरुवात केली, आणि स्वतःला खुप भाग्यशाली समजते की, मला थोडे तरी बुध्द समजले. पती निधनानंतर एकलकोंड्या आयुष्यात एक सृजनशीलता आली, जन्म - मृत्यू हा ठरलेला आहे, प्रत्येकाला त्याचा सामना करायचा आहे. आत्महत्या हा त्यावर पर्याय नाही. स्वतः ला सिद्ध करून जीवन स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. विधवा हा शब्द, तिला दिली जाणारी आजच्या याही समाजातील वागणूक खूप मन कष्टी करते ? माणूस म्हणून कसे घेतात हेच समजत नाही ? स्त्री - पुरुष ही दोनच चाके संसाराची भक्कम असावी. पण एकाच्या जाण्याने दुसऱ्याच्या म्हणण्यापेक्षा स्त्रीच्याच जीवनावर इतका का परिणाम होतो ? कोणी आणला हा सुवासिन - विधवा शब्द.कुंकू -हळद किती औषधी,पण त्याचा ही हक्क ठराविक वर्गासाठी...आपले सण साजरे करण्याची पद्धत मन विच्छिन्न करते.कशाला येतात संक्रात,होळी,नागपंचमी,दिवाळी,लग्न समारंभ नको - नको वाटतात.एकीचे कौतुक करायचे अन् एकीचा अपमान.काय मिळवतो आपण ?कुंकू लावत असताना नवऱ्याचे निधनच का होते ? किंवा पत्नी जिवंत राहण्यासाठी नवरे काय करतात ? काय पाळतात ? म्हणजे पुरुषाला आयुष्य हवे अन् स्त्रीला नको का ?कधी तरी विचार करावा ? ? अजूनही वेळ गेली नाही,शिकवण ही वर्तनातून,कृतीतून दिसली पाहिजे.नाहीतर त्या शिक्षणाचा काय उपयोग.आपल्या आयुष्याचा उपयोग सत्कर्मासाठी लावावा.मला कधीही अस्वस्थ वाटले,वा कोणतीही समस्या आली तर बुध्दांचे विचार ऐकते,पुस्तके,सुविचार वाचते तेव्हा मला खुप शांतता लाभते,मी क्षणात सर्व काही विसरून जाते.मला हे सांगावे वाटते की,तुम्ही बौध्द धम्म हा धर्म म्हणून पाहू नका,तर एक नवा विचार म्हणून पहा,समजून घ्या.नक्कीच तुमच्या आयुष्यात अचूक बदल घडेल.आजचे जग जे तंत्रज्ञानावर उभे आहे ते बुध्द विचारावर आधारित आहे.माणुसकीचे बीज त्यांनी मनामनात पेरले... त्यातून अंकुर फुटले पाहिजे,ते वाढले,विस्तारले पाहिजे,त्याची फळे आपल्याला खाता आली पाहिजे.



सौ. प्रतिमा अरुण काळे
संपर्क क्र. 9405042938

त्यांच्या विचारांनी जीवन जगताना आनंद वाटतोच.एवढे महान विचार जर आपण आमलात आणू शकत नाही तर आपला माणूस म्हणून काहीच उपयोग नाही,या पृथ्वीतलावरील सर्वचजण विचारांच्या छायेखाली यावे,तेव्हाच पृथ्वीच्या तेजाची झळाळी झळकेल.सर्व युद्ध संपलेली असतील,सर्वजण आनंदीत व प्रेमाने नांदत असतील,नवनवीन शोध घेत असतील हे सर्व शक्य आहे. विचार संस्कृतीमुळे माझ्यामध्ये तो संचार निर्माण झाला आहे.खोटं बोलायचे ठरवलं तरी बोलता येत नाही.कोणाचे वाईट चिंतावे हे मनी कधी येत नाही.सदा प्रफुल्लीत,प्रसन्न विचार मनात येतात. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी मनी प्रश्न येतात अन् त्याचे निरसन झाले तरच स्विकारते.एका मुक्त पाखरासारखं जीवन जगतेय असं वाटते.बुद्ध विचारांमुळे बरेच मुक्त झाले आहे.आपण सर्वांनी खरच बुद्ध समजून घ्यावे.आपल्या धर्माचं काय होईल याच्या विचारामुळे खरचं दुर राहू नका.बुद्ध आपल्यातील हरवलेला माणूस शोधून देईन तेव्हा ना धर्माची,ना जातीची आपल्याला पर्वा वाटेल.समानतेचे वारे वाहील हे नक्की.प्रत्येकांनी तथागताना आयुष्यात समजून घ्यावे,एवढेच सहृदयतेच मागण आपल्याकडे आहे.

जगाच्या दुःखाच्या शोधासाठी स्वतःच शरीर मातीमोल झाले तरी पर्वा न करणारा जगतातला एक शांतीदूत पुन्हा होणे नाही,सुख पायदळी लोळण घेत होते परंतु दुःख काय आहे याचा शोध घेण्यासाठी,घराचा,प्रिय पत्नी-पूत्राचा त्याग करून दुःख समजून घेण्यासाठी जाणारा बुद्ध.बुद्ध समजून घेताना एक शिकवण अंगी उतरवणे ती म्हणजे मनुष्य जन्म हा माणसाला लाभलेला एक अनमोल दागिना आहे. त्याचा उपयोग नीटनेटकेपणाने केला पाहिजे. जगात कोणतीही गोष्ट आपोआप घडत नसते ती घडवून आणणारी कारणे शोधली की माणसाचे जगणे सोपे होतं.माणूस दुःखमुक्त होतो. या साऱ्या गोष्टी बुद्धांना ज्ञात होत्या.बुद्ध समजून घ्यायचा असेल तर तो दैनंदिन जीवनात आपल्या आचरणातून प्रकट होत असे. वादविवादापेक्षा शांतता नेहमीच श्रेष्ठ असते,शांतता ही मनातूनच येत असते,त्याचा कुठेही शोध घ्यायला गेलात तर ती मिळणार नाही. संयम,कडवट असला तरी त्याची फळे मात्र गोडच असतात. स्वतःवर प्रेम करणारी व्यक्ती कोणालाही दुखवू शकत नाही. आपल्या वयाचा,पैशाचा,सौंदर्याचा,ताकदीचा घमंड नसावा. कालांतराने या सर्व गोष्टी संपणार आहेत हे नित्य ध्यानी असावे.

याचसाठी आपण,समाजासाठी लढा,लढू शकत नसाल तर लिहा, लिहू शकत नसाल तर बोला,बोलू शकत नसाल तर साथ द्या, साथ देवू शकत नसाल तर जो लिहितोय,बोलतोय,लढतोय त्याला मदत करा,हे पण करु शकत नसाल तर त्यांचे मनोबळाचे तरी खच्चीकरण होवू देवू नका. कारण ते तुमच्या हिश्याची लढाई लढत आहेत. जे आपल्या बुध्दीला पटत नाही,अन्याय होत असेल त्या विरूध्द आवाज हा उठला पाहिजे.कारण अन्याय करणाऱ्यापेक्षा सहन करणारा अधिक गुन्हेगार असतो.स्वार्थी विचार सोडून,समाज कल्याणाचा विचार केला जावा.

गौतम बुद्धांचे विचार आपण किती अंगिकारत आहोत याचा प्रत्येकाने थोडा तरी विचार केला तरी..आपल्यात आमूलाग्र बदल हा घडेलच. एक हजार लढाई जिंकण्यापेक्षा स्वतःवर विजय मिळवणे,म्हणजे मनावर विजय मिळविणे हे अधिक चांगले आहे. याचे उत्तम उदाहरण 'जगज्जेता सिकंदर' आहे.सारे जग जिंकून तो दुःखी होता. कारण स्वतःवर, स्वतः च्या मनावर विजय मिळवला तर सर्व काही जिंकता येते,ते तुमच्याकडून कोणीच हिरावून घेऊ शकत नाही.कोणतीही गोष्ट देण्यामध्ये काय सामर्थ्य आहे हे तुम्हाला जर कळत असेल तर तुम्ही कोणत्याही दिवशीचे जेवण हे एखाद्याबरोबर वाटून घेतल्याशिवाय राहू शकत नाही.इसाप नितीमध्ये माणुसकी धर्म पाळायला शिकवले,खरा माणूस ओळखायला शिकवले.निसर्गातील प्रत्येक जैविक - अजैविक घटकांकडून आपल्याला शिकता येते,ते आपले गुरू असतात. पाण्याकडून हे शिका,जोराच्या लाटेने कदाचित झुडुपं विखुरली जाऊ शकतात पण समुद्राची खोली ही मात्र शांत असते,त्यामुळे शांत राहायला शिका.किंवा लव्हाळी सारखे घट्ट रहायला शिका स्वतःच्या निर्णयावर,कितीही संकटे आली,वादळे आली तरी.कोणते काम करून झाले आहे हे मी कधीच पाहात नाही,कोणते काम करायचे शिल्लक आहे याकडेच माझे लक्ष असते.समाधान असेल तर सर्व गोष्टी शक्य होतात.तुम्ही तीच गोष्ट गमावता ज्या गोष्टीला तुम्ही अधिक बिलगता अथवा चिकटून राहता.भूतकाळ आधीच निघून गेला आहे आणि भविष्यकाळाबाबत तुम्हाला कोणतीही माहिती नाही.तुम्हाला जगण्यासाठी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे वर्तमानकाळ,त्यामुळे वर्तमानातच जगा.तुमच्याकडे वेळ आहे असा जेव्हा तुम्ही विचार करता तीच तुमच्यासाठी सर्वात मोठी अडचण आहे,कारण वेळ कधी कोणावर कशी येईल हे कधीच सांगता येत नाही,त्यामुळे जी वेळ आहे त्याचा व्यवस्थित उपयोग करून घ्या,जीभ ही एखाद्या धारदार सुरीप्रमाणे असते,पण त्यातून आलेले शब्द हे घायाळ करतात,रक्ताचा सडा घालत नाहीत इतकाच फरक आहे. सर्वांना हे तिहेरी सत्य शिकण्याची गरज आहे,उदार हृदय,दयाळू भाषा आणि सेवा व करूणेचे जीवन हे नेहमीच मानवतेचे सादरीकरण आणि नूतनीकरण करत असतात. जीवनावर प्रेम करणारी व्यक्ती ही नेहमीच विषप्रयोग टाळते त्यामुळे नेहमीच वाईट कृत्ये करणेही टाळा त्यामुळे जीवन अधिक सुखकर होईल.म्हणजे कोणावर विष प्रयोग करून आपण समोरच्या व्यक्तीचा घात करू शकणार नाही,किंवा असा विचार ही मनाला शिवणार नाही.याची किती तरी उदाहरणे आपण पाहिली आहेत,छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर घरातल्यांनीच,प्रत्यक्ष पत्नीनेच विष प्रयोग केला,स्वतः गौतम बुद्ध..त्यांना माहिती होते,आपला आज घात होणार आहे तरी ते समोरच्या व्यक्तीच्या म्हणजे 'परिचुंडच्या' आग्रहानुसार त्यांच्या घरी जेवण करण्यास गेले. ज्या खिरीने त्यांना तारले होते त्याच खिरीतून त्यांना विष पाजून त्यांचा घात केला गेला...किती लाजिरवाणी गोष्ट..जे आपल्याला काही तरी मौलिक शिकवण देतात..जीवन दृष्टीकोन देतात त्यांचाच असा घात होतो..

लोक तुमच्याशी कसे वागतात हे त्यांचे कर्म आहे.पण तुम्ही त्यांच्याशी कसे वागता हे मात्र तुमचे कर्म आहे.त्यामुळे कोणाशीही वागताना चांगलेच वागा.कर्माचे फळ तुम्हाला नक्कीच मिळेल. दयाळूपणा दाखवा,नेहमी प्रेमाने वागा, तुमचा हेतू चांगला आहे ना हे तपासून पाहा.तुमची वागणूक योग्य आहे ते तपासा आणि नेहमी दुसऱ्याला माफ करण्याची क्षमता ठेवा.तुमच्याबरोबर घडलेल्या वाईट गोष्टींना तुमचे स्वतःचे कर्मच जबाबदार आहे हे एक दिवस तुमच्या नक्की लक्षात येईल.तुम्ही केलेल्या कर्माची फळंच तुम्हाला इथेच भोगावी लागतात.तुम्हाला नेहमी काय योग्य वाटते तेच बोला आणि कोणत्याही गोष्टीसाठी दुःख करून घेऊ नका,नेहमी चांगला विचार करा,दुसऱ्यांबरोबर चांगले वागा,त्यांच्याबद्दल चांगले बोला. या सगळ्याचा परिणाम म्हणजे तुमचेही नेहमी चांगलेच होईल. आपण काय विचार करतो त्याचप्रमाणे आपण माणूस म्हणून जगतो. आपण आपल्या विचारानुसारच मोठे होत असतो.आपल्या विचारांनीच जग बनते हे लक्षात ठेवा.कोणाचाही सूड उगवू नका,आपल्या कर्माला त्याचे काम करू द्या.कारण कोणतीही वाईट गोष्ट जास्त काळ टिकत नाही.चित्त हे पाण्याप्रमाणे आहे,जेव्हा पाणी खळाळतं असतं त्याचप्रमाणे चित्त थाऱ्यावर नसतं तेव्हा काहीच दिसत नाही.पण,पाणी जेव्हा शांत असतं तेव्हा त्याचा तळंही दिसतो. त्याचप्रमाणे चित्त थाऱ्यावर असेल तर कोणत्याही संकटाचा सामना करणं अत्यंत सोपे होते.दुःख हे टाळता येण्याजोगे अजिबातच नाही. पण त्यामध्ये किती रमून राहायचे हे आपल्या हातात आहे. त्यामुळे हा पर्याय निवडायचा की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवायचे.रोज सकाळी आपला पुनर्जन्म होत असतो. आपण जे काही करतो ते आजच्या दिवसापुरतेच ठेवा. अन्यथा आयुष्यभर त्रासच सहन करावा लागेल. आपल्या मनावर ताबा मिळवा,तेच साऱ्या गोष्टीचे तारक -मारक आहे. मनावर विजय मिळविणे महा कठीण आहे तो मिळविण्यासाठी ध्यान धारणा, योगा, प्राणायाम करा, सात्विक आहार घ्या, विचार सात्विक ठेवा.

एक क्षण, एक दिवस बदलू शकतो, एक दिवस आयुष्य बदलू शकतो आणि एखाद्याचे आयुष्य हे संपूर्ण जग बदलू शकतो.एक लहान मेणबत्तीचा प्रकाशही अंधार दूर करण्यासाठी खूप आहे. त्याचप्रमाणे एखादी लहानशी कृतीही तुमचे संकट दूर करण्यासाठी मोठी ठरू शकते.अशी कल्पना करा की जगातील प्रत्येक व्यक्ती ही तुम्हाला प्रकाश देत आहे.त्यामध्ये तुमचे मार्गदर्शक, शिक्षक, मित्रमैत्रिणी प्रत्येक जण तुम्ही चांगलं करावं यासाठी मदत करत असतात.तुम्ही जर योग्य दिशेने वाटचाल करत असाल तर तुम्ही त्या दिशेनेच चालत राहायला हवं.लोकांशी बोलताना शब्द हे काळजीपूर्वक वापरायला हवेत.कारण आपण बोललेल्या शब्दांचा त्यांच्यावर चांगला आणि वाईट हा दोन्ही परिणाम होणार असतो. केवळ कल्पना म्हणून केलेली कल्पना राहणं योग्य नाही तर त्यावर अंमलबजावणी करण्यात आली तर त्याला महत्त्व आहे. श्रीमंत आणि गरीब ही दोन्ही माणसं सारखीच आहे, दोघांवरही दया करा. कारण संकंटं आणि त्रास हे सगळ्यांनाच असतात. कोणतीही गोष्ट करायची असेल तर ती नेहमी मनापासून करा. मी संतुष्ट, तृप्त, समाधानी,भाग्यवान आहे असेच प्रत्येक वेळी मनाला सांगा. त्यांनी लोकांना सांसारिक दुःखापासून दूर जाण्याचा मार्ग दाखवला. लोकांना शिकवले की जीवनाचे शेवटचे लक्ष निर्वाण आहे. बुद्धांनी चांगले कर्म करण्याचा संदेश दिला.बौद्ध धम्म सत्य व अहिंसेवर आधारित आहे.वाईट गोष्टींपासून दूर राहण्याकरिता आपल्यामध्ये चांगल्या गोष्टींचा विकास करा आणि आपले मन सकारात्मक गोष्टींनी भरा.स्वर्गाचा मार्ग आकाशात नव्हे तर आपल्या हृदयात आहे.धबधबा खूप आवाज करतो,समुद्र शांत आणि खोल असतो, ज्ञान ध्यानाद्वारे उत्पन्न होते,आणि ध्यानाशिवाय ज्ञान हरवून जाते. गौतम बुद्धांनी तत्कालीन प्रथा आणि अंधश्रद्धा नाकारल्या आणि एक साधा मानवधर्म स्थापन केला.ते म्हणाले की, जीवन संयम,सत्य आणि अहिंसेचे पालन करून,एखाद्याने शुद्ध आणि साधे जीवन जगले पाहिजे.त्यांनी 'सम्यक' प्रथेला कृती,भावना आणि ज्ञानाशी जोडण्यावर भर दिला,कारण कोणताही 'अतिरेक' शांती देऊ शकत नाही.त्याचप्रमाणे,एखाद्याला दुःख आणि मृत्यूच्या भीतीपासून स्वातंत्र्य मिळू शकते आणि त्याने फक्त भीती आणि शांततेपासून स्वातंत्र्य म्हटले आहे.त्यांनी मानवजातीला सुचवलेला निर्वाणाचा मार्ग आज अडीच हजार वर्षांपूर्वी होता तितकाच सुसंगत आहे,त्याने स्वतः राजेशाही सुखांचा त्याग केला आणि मानवतेच्या उद्धाराचा मार्ग शोधण्यासाठी अनेक प्रकारच्या शारीरिक यातना सहन केल्या. आज जेथे जातो तेथे आम्ही आमच्या जीवनाचे उद्धारक असणारे सर्वच महापुरुष फक्त फोटोमध्ये बंदिस्त करून ठेवत आहोत. खरंतर त्यांच्या विचारांचा पाईक होण्यापासून दूर होत गेलो,हा खरंतर आम्हीच आमच्या हाताने आमचा ऱ्हास निर्माण केला,अन् माणसांच्या बुरसटलेल्या विचारांनुसार गटातटात विभागले जावून सौख्यमयी विचार डोक्यात घेऊन मार्गक्रमण करण्याऐवजी वाचून मोठे होण्यापेक्षा, नाचून मोठे होण्याच्या विचार सरणीचे खंदे पुरस्कर्ते होण्यावर अधिक भर आम्ही दिला असल्याचे चित्र आज जगभर दिसतंय,त्याचं मुळ कारण,शांततेचा अभाव,हिंसेचा प्रभाव आणि याची रूजलेली पाळंमुळं तसेच प्रत्येकाच्या आयुष्यातून हरवलेलं सुख आणि त्या सुखाच्या शोधात हरवलेली माणुसकी, हरवलेली आपुलकी,जिव्हाळा महत्वाचे कारण ठरताना माणूस म्हणून तथागत समजून घेण्यासाठी आज आम्ही खरंच कमी पडलोय हीच आमची विचारसरणी आम्हाला या खड्ड्यात घेऊन जाण्यासाठी आम्हीच कारणीभूत आहोत असं म्हणताना मी एवढेच म्हणेन 'प्रत्येकाने तथागत व्हावं असं नाही पण त्याची वाट नक्की चालावी.' एवढी शिकवण जरी प्रत्येकाच्या अंतरात कोरली तरी आम्ही बुद्ध समजून घेताना बुद्धाच्या शिकवणूकीला अंशतः आमच्या हृदयी कोरल्याचे समाधान निदान या पिढीच्या मुखावर दिसून येईल.

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी करणार ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306


आधुनिक केसरी

**महाविद्यालयीन स्तरावर नवीन शैक्षणिक धोरण लागू अंमलबजावणी करण्याची राज्यात तयारी सुरू झाली असली तरी माध्यमिक स्तरावर या धोरणाची अंमलबजावणी करण्याची गती कासव गतीने असल्याने येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होण्याची  शक्यता फारच कमी आहे. राज्यात येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) आणि संबंधित विभागांना योग्य त्या सूचना दिल्या आहेत', असे राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले असले तरी.**

शैक्षणिक आराखडा तयार नसताना येत्या वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी करणार, असा प्रश्न शिक्षण तज्ज्ञांनी केला आहे.

राज्यात नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याच्या दृष्टीने हालचालींना वेग आला आहे. शिक्षण क्षेत्राचा चेहरामोहरा या धोरणामुळे बदलला जाणार आहे. राज्यात उच्च शिक्षणात पुढील वर्षीपासून हे धोरण लागू करण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार लागू करण्याच्या हालचाली विद्यापीठ पातळीवर सुरू आहेत.

शालेय शिक्षणातही नवीन शैक्षणिक धोरणाची येत्या वर्षापासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याची घोषणा राज्याच्या  शिक्षण विभागाने स्पष्टर  केले आहे. सगळ्याच पातळ्यांवर या धोरणाची अंमलबजावणी एकाचवेळी सुरू करता येणार नाही. त्यामुळे जे बदल सुचविले आहेत ते टप्प्याटप्प्याने करून शैक्षणिक धोरण राबविले जाणार आहे, शिक्षण मंत्र्यांनी देखील स्पष्ट केले. शालेय स्तरावर येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यावर तज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांकडून शंका उपस्थित केली जात आहे. केंद्र सरकारकडून अद्याप राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा अंतिम झालेला नाही. तो अंतिम झाल्यावरच या आराखड्यानुसार राज्यात 'एससीईआरटी'ला अभ्यासक्रम आराखडा तयार करावा लागणार आहे. 'एससीईआरटी'ने नवीन आराखडा तयार केल्यानंतर त्याला राज्य सरकारची मंजुरी लागेल. हा अभ्यासक्रम आराखडा तयार झाल्यावर पुस्तकांची निर्मिती करावी लागणार आहे. तसेच शिक्षकांचे प्रशिक्षण आणि नवीन धोरणानुसार विविध पातळ्यांवरील बदल करावे लागणार आहेत. त्यामुळे'एससीईआरटी'कडून अभ्यासक्रम आराखडा तयार नसताना शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी केली जाणार, असा



प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच या वर्षात राज्यात नवीन शैक्षणिक धोरण लागू करणे शक्य नसल्याची चर्चा विविध पातळ्यांवर तज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. आपल्याकडे शाळांचे वेगवेगळे प्रकार आणि वेगवेगळ्या भाषांतील शाळा आहेत. या सर्व घटकांशीही चर्चा करावी लागणार आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण यावर्षी लागू करणे शक्य नसल्याचे  मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात पूर्वीच्या '१० + २ +३'च्या आकृतीबंधाऐवजी '५ + ३ + ३ + ४' असा आकृतीबंध स्वीकारण्यात आला आहे. या आकृतीबंधानुसार, पहिले तीन वर्षं अंगणवाडी आणि पहिली, दुसरीचे वर्ग यांचा एकत्रित करून पायाभूत टप्पा म्हणून स्वीकारण्यात आला आहे. येथील अभ्यासक्रमाची तत्व आणि आराखडादेखील केंद्राने निश्चित केला आहे. पुढे तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नंतर नववी ते बारावी असे टप्पे निर्धारित करण्यात आले आहेत. तिसरीच्या आरंभिक टप्प्यावरती प्रत्येक मुलाला भाषिक व अंकिय साक्षरता प्राप्त करून देण्याचे उद्दिष्ट राखण्यात आले आहे. त्यासाठी 'निपुण भारत' नावाने अभियान देखील सुरू करण्यात आले. २०२६ पर्यंत या देशातील तिसरीच्या टप्प्यापर्यंत ही साध्यता अपेक्षित आहे. या स्तरावर अंगणवाडी आणि प्राथमिक शाळा जोडल्या जाणे महत्त्वाचे आहे. सध्या अंगणवाडी महिला बाल कल्याण विभागाशी जोडलेल्या आहेत. आता तेथे अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. प्राथमिक शिक्षण हे शिक्षण विभागाशी निगडीत आहे, तर शिक्षक ग्रामविकास विभागाचे आहे. अंगणवाडीतील अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, तेथील ताईंचे प्रशिक्षण, पर्यवेक्षण हे प्रभावी करण्यासाठी ही खाते एकत्रित करण्याची गरज आहे. अद्याप तरी या संदर्भात उचित कार्यवाही देशभर होऊ शकलेली नाही. नवीन शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत विशेषतः उच्च माध्यमिक स्तराचा अर्थात वरिष्ठ महावद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालया बाबत एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला जात आहे ...महाराष्ट्रात जिथे वरिष्ठ महाविद्यालय आहेत तिथे कनिष्ठ महाविद्यालये जोडण्यात आलेली आहेत.इतर राज्यात वर्ग ११ वी व १२ वी चे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेली आहेत. विशेष म्हणजे वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या हजाराच्या घरात आहेत.अशा कनिष्ठ महाविद्यालयाना कुठं जोडल्या जाणार आहे ?.अशा कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रशासन स्वतंत्र राहणार काय ? की परिसरातील माध्यमिक विद्यालये जोडल्या जातील  ? याबाबत अजूनही शासन स्तरावर निर्णय झालेला नसल्याने या प्राध्यापकांसमोर मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. नवीन शैक्षणिक धोरणात माध्यमिक स्तरावरील विषयांची निवड, संशोधन संस्थाची निर्मिती, शिक्षकांचे मूल्यमापन, भरती प्रक्रिया, एकात्मिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, शिक्षण आयोगाची स्थापना, कमी पटाच्या शाळा, नव्या अभ्यासक्रमाची रचना यांसारख्या अनेक गोष्टींच्या संदर्भाने अपेक्षित केलेले बदलांचा विचारही महत्त्वाचा आहे.
या संदर्भाने पावले पडण्याची गरज आहे. केंद्र सरकारचा अभ्यासक्रम आराखडा आल्यानंतर राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसित केला जाईल. अभ्यासक्रमाचे विकसन आणि नंतर पाठ्यपुस्तके येतील. यासाठी बराच कालावधी लागेल. त्यामुळे लगेच एका वर्षांत हे परिवर्तन घडेल, असे घडणार नाही. उच्च प्राथमिक स्तरावर रोजगारभिमुख शिक्षणाचा विचार करण्यात आला आहे. जोवर केंद्र सरकारच्या अभ्यासक्रमाचा आराखडा अंतिम होत नाही, तोवर राज्यात अंमलबजावणी होणार नाही. करण्याचा निर्णय झाला तरी कोणते विषय निश्चित केले जाणार ? ते कसे निश्चित केले जाणार ? त्या विषयांसाठी निर्देशकांची व्यवस्था, इतर तासिका कोणत्या विषयांच्या कमी होणार ? त्यासाठी सुविधा कोण आणि कशा पुरविणार आहे ? त्याच शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार का ? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागणार आहेत.

# तरुण पिढी नशेच्या आहारी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**तरुणांमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या व्यसनाबद्दल अनेक दिवसांपासून चिंता व्यक्त केली जात आहे.याला आळा घालण्यासाठी कडक कायदे आहेत, अंमली पदार्थ विरोधी पथके सक्रीय दिसतात, तरीही त्यांची उपलब्धता कमी होताना दिसत नाही किंवा सेवन करणाऱ्यांची संख्याही कमी होत नाही. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे की 10 ते 17 वयोगटातील किशोरवयीन मुले पुढील दशकात मोठ्या प्रमाणात ड्रग्सच्या आहारी जाऊ शकतात.**

मानसिक आरोग्याच्या समस्या, कामाचा ताण, वाढती बेरोजगारी आणि बदलती सामाजिक-आर्थिक परिस्थिती यांचा या गटावर सर्वाधिक परिणाम होतो. यामुळे, ते सहजपणे नशेच्या प्रभावाखाली येतात.  या अभ्यासानुसार ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात अमली पदार्थांच्या व्यसनाची व्याप्ती वाढणार आहे. भारत हा तरुणांचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याने हे संशोधन अधिक चिंताजनक आहे. यावर मात करण्यासाठी संशोधकांनी काही उपाय सुचवले आहेत, ज्यामध्ये पालक आणि सामाजिक संस्थांची जबाबदारी अधोरेखित करण्यात आली आहे. परंतु ज्या पद्धतीने अंमली पदार्थांचा व्यवसाय वेगाने फोफावत आहे, त्यामुळे या संस्था अनेकदा हतबल झाल्याचे दिसून येते.

आजूबाजूला असलेल्या समाजातील लोक, चित्रपटातील नायक,  वरिष्ठ, त्यांच्या कुटुंबातील सदस्य इत्यादीचे व्यसन पाहून अनेकजण पौगंडावस्थेत ड्रग्जकडे आकर्षित होतात हे वास्तव आहे. मग कंटाळा, चिडचिड, रिकामेपणा, अभ्यास आणि कामाच्या दबावाखाली या पदार्थांचे सेवन वाढते. आता महानगरांपासून लहान शहरांपर्यंत बेकायदेशीर अवैध मादक पदार्थांची उपलब्धता



सातत्याने वाढत आहे. ही काही लपून राहिलेली गोष्ट नाही आणि अनेक प्रकारची नाशिले पदार्थ बाजारात सहज उपलब्ध आहेत की त्यामुळे आताच्या घडीला अनेक किशोरवयीन, तरुणांना ती एक सर्रास वापरणारी वस्तू वाटू लागली आहे.  असे नशिल्या पदार्थांचे पालक, शिक्षक, नातेवाईक, परिचित यांच्यापासून लपून, छुप्या पद्धतीने सेवन केली जातात, त्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवणे कठीण जाते.

अनेक पालकांना याची कल्पना तेव्हाच मिळते जेव्हा त्यांच्या मुलांमध्ये काही गंभीर आरोग्य समस्या निर्माण होते.तोपर्यंत त्यांचे व्यसन आटोक्यात आणण्यास उशीर झालेला असतो आणि अनेक किशोरवयीन मुलांना समुपदेशन करूनही काही फायदा होत नाही. ते आक्रमक होतात आणि सतत घुश्श्यात ( रागात ) असतात. गेल्या काही वर्षांत अशी अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत, ज्यामध्ये अमली पदार्थांची मोठी खेप कोणत्या ना कोणत्या बंदरावर किंवा अन्य ठिकाणी पकडली गेली. त्यांच्या आधारे देशात अमली पदार्थांचा किती मोठा व्यवसाय फोफावत आहे, याचा अंदाज बांधता येतो. पण जेव्हा जेव्हा अशा पदार्थांच्या खरेदी-विक्रीवर पायबंद घालण्याचा प्रश्न येतो, तेव्हा तेव्हा तुरळक प्रमाणात नशेचे सेवन करणाऱ्या काही लोकांना पकडून त्यांची जबाबदारी पूर्णत्वास नेली जाते. यातून यातले खरे सूत्रधार मात्र बाहेरच राहतात.काही प्रसंगी या व्यवसायात अनेक राजकीय प्रभावशाली व्यक्तींची नावेही समोर आली आहेत, मात्र यात कुणालाच नवल वाटत नाही. अशा स्थितीत किशोरवयीन आणि तरुणांमधील वाढत्या अमली पदार्थांच्या व्यसनाला आळा घालण्यासाठी सरकारी यंत्रणेने प्रबळ इच्छाशक्ती दाखवावी, अशी अपेक्षा आहे. ज्यांच्या बळावर देशाच्या विकासाची स्वप्न रंगवली जात आहेत, ती तरुण पिढीच नशेच्या आहारी गेली, तर आपल्या देशाचा विकास कसा होणार ? याचा विचार गांभीर्याने झाला पाहिजे.

# श्रेष्ठ निसर्गकवी, बालकवी

आधुनिक केसरी


५ मे हा बालकवी त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचा स्मृतिदिन, ***आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहीकडे, हिरवे हिरवे गार गालिचे, हरित मखमालीचे, श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी लेवून,*** अशा कितीतरी कवितांनी



महाराष्ट्राला भुरळ पाडली. एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्राला परीचित होते. बालकवी त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचा जन्म १३ऑगस्ट १८९० रोजी धरणगाव खान्देश येथे झाला. थोरली बहीण जिजींनी त्यांना काव्याची गोडी लावली.वडील बापूजी देवराम ठोमरे, गोदुबाई ह्या बालकवींच्या आई. बालकवीच्या वडीलांची पोलिस खात्यातील नोकरी फिरतीची असल्याने त्यांच्या शिक्षणाची आबाळ झाली. एरंडोल, यावल, जामनेर, बेहावा अशा विविध ठिकाणी त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.

नद्या, डोंगर, नाले, ओढा यांचे बालकवींना आकर्षण होते.वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षातच त्यांना काव्यलेखनाची गोडी लागली. पुढे रेव्हरंड टिळकांची भेट झाली. त्यांच्या कवितेवर रेव्ह टिळकांचे काही संस्कार झाले. बालकवीच्यां काव्यगुणाची जोपासना झाली. निसर्ग देवतेची  काव्यमय उपासना करणारे कवी म्हणुन ते ओळखले जातात. निसर्गाची विविध रूपे त्यांनी शब्दात मांडले आहे. त्यांचे प्रतिबिंब काव्यातुन उमटत गेले. १९०७मध्ये जळगाव येथे भरलेल्या पहिल्या महाराष्ट्र कवी संमेलनात त्यांनी अल्पमती मी बालक,नेणे काव्यशास्त्र व्युत्पत्ती |कविवर्यांनो मदिय बोबडे बोल धरा चित्ती| हि कविता गायली यावेळी सारा जनसमुदाय या कवीला पाहुन अचंबित झाला. या संमेलनाचे अध्यक्ष डॉ.कान्होबा रणछोडदास किर्तीकर यांनी त्यांना बालकवी ही उपाधी दिली. जळगाव येथे ५मे १९१८ रोजी भाचीच्या लग्नासाठी निघालेले असताना भादली स्टेशनजवळ मालगाडीची त्यांना धडक बसली आणि महाराष्ट्राने एक प्रतिभासंपन्न कवी गमावला. मराठी साहित्यविश्व पोरकं करून गेले. किती थोर लेखन घडले त्यांच्या हातून बालकवींच्या स्मृतीस आणि त्यांच्या काव्य प्रतिमभेला अभिवादन!

**संतोष दत्तू शिंदे, मु.पो. काष्टी, ता. श्रीगोंदे, जि. अहमदनगर**
**मो.७७२१०४५८४५**



# पराक्रमी सरदार कान्होजी जेधे

आधुनिक केसरी

पराक्रमी मराठी सरदार कान्होजी जेध., कान्होजी शहाजीराजांकडे चाकरी करणे अगोदर, निजामशाहीचे वतनदार होते. त्यांच्याकडे रोहिडे खोऱ्याचे वतन होते. निजामशाहीत त्यांनी अनेक लढायांमध्ये आपली मर्दुमकी दाखवली होती. आदिलशाहीचा सरदार रनदुल्लाखानानेच, शहाजीराजांना कान्होजीचा परिचय करून दिला होता. ते त्यांची स्वामिनिष्ठा एकूण होते.

ही गोष्ट साधारण 1635 च्या दरम्याची आहे. नंतर 1636 च्या सुमारास अहमदनगरची निजामशाही संपुष्टात आली.त्यानंतर शहाजीराजे पूर्णपणे आदिलशहाकडे चाकरीस राहिले. तेव्हा रनदुल्ला खानाकडून शहाजीराजांनी, कान्होजीस आपल्याकडे मागून घेतले. सन 1648 साली शहाजी राजांसोबत, कान्होजींना देखील जिंजीस नजर कैदेत ठेवण्यात आले होते. त्या वेळी त्यांच्याशी त्यांची चांगली मैत्री झाली. कान्होजी जेधे यांचा जन्म कारी गावी झाला. त्यांच्या वडिलांची वतनदारीच्या भांडणात हत्या झाली.  नंतर मात्र काही दिवसाच्या अंतराने त्यांच्या आईची सुद्धा हत्या करण्यात आली. लहान कान्होजी पोरके झाले, यावेळी कान्होजी जेधे यांच्या जीवावर, बेतलेल्या प्रसंगात इमानी व स्वामीनिष्ठ चाकरीत असलेले देवजी महाले यांनी त्यांचे प्राण वाचवले. पुढे त्यांना बाजी पासलकर यांच्या स्वाधीन केले, व त्यांचा सांभाळ करण्याची शपथ त्यांच्याच्याकडून घेतली. पुढे बाजी पासलकरांनी जीवापाड प्रेम करून त्यांचा सांभाळ केला व त्यांना युद्धाचे उत्तम प्रशिक्षण दिले, आणि त्यांना आपली मुलगी देऊन त्यांना आपले जावई करून घेतले व पुढे त्यांची देशमुखी व त्यांचे वतन त्यांना मिळण्यासाठी सहाय्य केले.  त्यांनी आपल्या आई-वडिलांना मारणाऱ्या भावबंधांचा खून करून त्याचा बदला घेतला. संपूर्ण बारामावळात कान्होजींनी, आपल्या पराक्रमाने व सचोटीच्या वर्तनाने आपला दरारा बसला होता. कितीही अवघड किल्ला असला तरी खास तंत्र वापरून तो जिंकायचा. कान्होजी जेधे हे शहाजीराजांचे समकालीन असल्यामुळे त्यांचे चांगले मित्र झाले, **क्रमशः**

# ओझरत्या आयुष्याच्या विस्मरणीय पाउलखुणा...



परमेश्वर घुंगासे
संपर्क क्र. 7499643065

आधुनिक केसरी

**जन्म, बालपण, तरुणपण, प्रपंच आणी मृत्युची वाट बघत तिला केविलवाणी साद घालत या यात्रेचा शेवट करून या पृथ्वीतलावरून निघून जान... या सर्व गोष्टी जरी अंतिम सत्य असल्या तरी मानव आपल्या अपेक्षांच्या अतिउच्च ओझ्याखाली स्वतः मात्र रोज स्वतःलाच मारत असतो. यांची कारणे सुद्धा तशीच आहेत माणूस यंत्र होऊन या जागाच्या स्पर्धेत टिकण्याचा त्याचा मानस योग्यच  आहे अन्यथा जगाची गती कुणासाठी ना आजवर थांबली ना पुढे कुणासाठी थांबेल जो व्यक्ती बदलत्या काळानुसार या मध्ये स्वतःला सामावून घेईल,अपेक्षेनुसार स्वतःमध्ये आणी स्वतःमधील शैक्षणिक कौशल्यामध्ये बदल करण्यास तत्पर असेल तो या स्पर्धेत मार्गक्रमण करत राहील.**



काही काळ मागे जाऊन विचार करूयात, पूर्वीच्या काळी म्हणजे 80/90 च्या दशकात मानवांच्या अपेक्षांच्या यादीत बोटावर मोजण्याइतक्याच गोष्टी होत्या त्यात घर,अन्न,आणी काम या प्रमुख गोष्टींकडे त्यांचा कल जास्त असावा अस माझं मत आहे ! आत्ता मात्र पूर्ण याच्या विपरीत चित्र आहे जग बदललंय डिजिटल वर्ल्ड चे स्वप्न आपण रंगवु लागलोय,किती सहजपणे आपण बदलत्या काळासोबत जमवून घेतलंय,परंतु काही गोष्टी आपण जबाबदारीने म्हणा किंवा पर्याय नसल्यामुळे म्हणा स्वतःला अनेक बंधनात गुंतून ठेवलंय किंवा गुंतून गेलोय अनेक अश्या गोष्टी आपण काळानुरूप बदलण्याच्या ओघात एका परिघापुरत्या अंधुक झाल्या किंवा लोप पावल्या ! परवा संभाजीनगर मधील एका इंग्लिश स्कूल समोरून जाण्याचा योग आला एक लहान मुलगा पाठीवर दप्तर घेऊन जाताना दिसला सहज म्हणून विचारण्याचा प्रयत्न केला काय रे कितवीला आहेस ? तस त्याने उत्तर दिल, सिनिअर केजी  मनात आल एवढा ताण अभ्यासाचा तोही एवढुश्या वयात डोळ्यासमोरून फ्लॅशबॅक गेला आमच्या काळात, शाळा सुटली की आम्ही मित्र मनसोक्त खेळायचो त्यात दुचाकीचे टायर घेऊन पूर्ण गावभर एका काडीने त्याला पळवत दम लागायचा,  बिना अन्न पाण्याचे रात्र होईपर्यंत हुदडायचो जाम भुक लागायची की घर गाठायचो आणी  गिळलं की झोपायचो. होमवर्क आणी टार्गेट असले  नावाचा प्रकार माहीत नव्हते कधी-कधी  रात्री आजी गोष्टी सांगायची  फार मजा यायची. पावसाळ्यात चिक्कार धो-धो पाऊस पडायचा . पत्र्याचे वर्ग गळायचे, वर्गात पाणी साठायचं. मग सुट्टी! सरांनी  सुट्टी सांगितली की आम्ही आनंदाच्या भरात पावसातच घरी निघायचो. घरी जाईपर्यंत पुर्ण भिजायचो. कधी-कधी सकाळीच रिमझिम पाऊस सुरू व्हायचा मग आज पुन्हा शाळेला सुट्टी मिळणार असं वाटून खुष व्हायचो पण मग आई कोप-यात अडगळीला पडलेली छत्री हातात देऊन शाळेचा रस्ता दाखवायची . मी छत्री घेऊन निघालेलो बघून माझा मित्र देखील छत्रीत यायचा मग दोघंही खांदे भिजवत शाळेत जायचो . वाटेत एखाद्या पन्हाळ्याखाली मुद्दाम छत्री घेऊन उभे रहायचो . वेगळीच मज्जा यायची. आत्ता पाऊस भर उन्हाळ्यात एप्रिल/मे च्या दरम्यान सुद्धा कोसळतो,एकंदरीत सगळंच बदललय यात शंका नाही.माणसाने निसर्गाची वाट कुठेतरी अडवली असेल म्हणून तो आडवाटेने आपल अस्तित्वाच दर्शन विद्रुप रित्या करवत असतो.निसर्ग हा निस्वार्थी पणाने अब्जावधी काळापासून आपल्याला हवी ती प्रत्येक गोष्ट देत आलाय मात्र आपण आपल्या हितासाठी त्याला बाजूला सारत आपल्या अपेक्षा पूर्ण करत आलोय ! म्हणूनच की काय आम्ही 400-500 स्कवेयर फूट च्या बंधिस्त भिंतीच्या आड बसून केवळ आठवणी मोजत बसतोय आणी कुठे निसर्गाने कित्येक वाटसरूंना आपल्या कुशीत  आश्रय दिलाय !  भौतिक सुख सोयींच्या शोधात आपण एवढे गुंतून आहोत की सवतःला जगण्यासाठी सुद्धा लाल तारखेची वाट बघावी लागते हे शाश्वत सत्य नाकारून चालणार नाही !

# ओढ्याकाठचा गाव



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**पावसाळ्यात मी गावी आलो. भाद्रपदाच्या महिन्यात दणक्या पाऊस झाला की, नदी-नाले-ओढे कसे खळखळून वाहताते. शांतिब्रह्म संत एकनाथ महाराजांच्या पावन भूमीत माझे गाव आहे. पैठणच्या पश्चिमेस चाळीस किलोमीटर अंतरावर गाव असून गावापासून गोदावरी नदी अवघ्या पाच किलोमीटरच्या अंतरावरून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. माझ्या गावाला उत्तर आणि दक्षिणेस असे दोन ओढे असून ते पूर्वेकडून वाहात येऊन गावाला वळसा घालून पश्चिमेस गोदावरी नदीला जाऊन मिळतात.**

गावाच्या दक्षिणेकडील ओढ्यात मी फारसा हिंडलेलो नाही.क्वचित एक-दोनदा या ओढ्याकाठी जाण्याचा प्रसंग आला. या ओढ्याच्या दोन्ही बाजूने केकताडाचे दाट बेटे लगातार उगवलेली असून त्यामध्ये भले मोठमोठे साप ( सर्प ) वावरतात, आणि काटेरी केकताडाच्या पाठीमागे चिंचांच्या झाडांची दुतर्फा दाट रांग असून त्याझाडांची सावली ओढ्याच्या पाण्यावर पडते. त्यामुळे या ओढ्याच्या वाहत्या पाण्यावर क्वचितच सूर्यप्रकाश पडत असे. मग दिवसाही अंधार पडल्यासारखे भासते. गावच्या उत्तरेकडील ओढ्यापेक्षा हा ओढा जास्त खोल व त्याचे पात्रही रुंद असून त्यामध्ये सतत बारमाही पाणी वाहत असते.
गावच्या उत्तरेकडील ओढा. हा ओढा माझ्या घराच्या आणि प्राथमिक शाळेपासून हाकेच्या अंतरावर आहे. या ओढ्याकाठी मी माझ्या बालपणी फार वेळा एकटाच तर कधी-कधी मित्रांसोबत हिंडलेलो आहे. या ओढ्याचा पूर्वेकडील गायरानाच्या टेकडीवर त्याचा जन्म झालेला असून तो गावाच्या उत्तर भागाला वळसा घालून पुढे पश्चिमेकडे गोदावरीला जाऊन मिळतो. या ओढ्याच्या निर्मळ धारेत. मला माशासारखे पोहून जवळ जवळ बरीच वर्षे लोटली होती.जसजशी मला माझ्या बालपणीच्या ओढ्याकाठी फिरण्याची व त्यापाण्याच्या निर्मळ धारेत पोहण्याची आठवण होताच आता ओढ्यातील पाण्याच्या निर्मळ धारेत अंघोळ करण्याची माझी इच्छा अनावर झाली.
काही गावांच्या ओढ्यांना छान नावे असतात. पण मी फार नशीबवान आहे. माझ्या गावाला दोन-दोन ओढ्यांची देणगी लाभलेली असून ते गावाला वळसा घालून जवळच असलेल्या गोदावरी नदीस मिळते. परंतु या दोन्हीही ओढ्याला असे काही नाव नाही. या ओढ्यांना आजूबाजूच्या लहान ओहळा-नाल्यांनी त्यात मिळून या ओढ्यांना मोठेपणा दिला आहे. भाद्रपदाचा पाऊस पडला की ही दोन्हीही ओढे खळखळून वाहत असे. आणि मला स्वच्छ धारेतल्या थंड पाण्यात पडून कितीतरी वर्षे लोटली होती. या दिवसात अंगणातल्या मायाळू मातीत सडा सारवण्याचा गंध चोहीकडे दरवळू लागे. ओढ्याकाठच्या झाडावर थांबलेली पाखरांची ओळखीच्या स्वरलकेरी ओढ्याकाठी घुमत असे.
मी जेव्हा आमच्या गावाच्या प्राथमिक शाळेत शिकत होतो,तेव्हा उत्तरेकडील या ओढ्याचे आणि माझे किती हितगुज होते ? याओढ्याकाठच्या दोन्ही बाजूने असलेली शेरांच्या झाडांची रांग, बाभळी लिंब व इतर झाडांची संख्याही जास्त आहे आणि त्या पाठीमागे बोरवन. बोरांच्या हंगामात आम्ही शाळकरी मुले हमखास गर्दी करत.कारण पौषातल्या थंडीच्या एखाद्या सकाळी निरोप येतो गाव शिवाराजवळच्या या ओढ्या काठावरील बोरवनाचं! मायाळू बोरवन,बोराच्या मधाळ गंधानं पिकून गेल्याचा! वनातून वाहणारा वारा आम्हा शाळेतल्या मुलांना बोलावून घेतोय, कानात सांगतोय, बोरं पिकून गोड - आंबट झाल्याचा! मग आम्ही मुले छोट्याशा पिशव्या घेऊन सुटीच्या दिवशी उत्तरेकडील ओढ्याकडे धाव घ्यायचो. व इवल्याशा हातांनी टपोरे लाल - पिवळी बोरं गोळा करून बोरांचा गाभुळलेला गंध नाकात भरून घ्यायचो. एक - दोन पिकलेली बोरं तोंडात टाकत तोंड वेडंवाकडं करून पाहायचो. दव थेंबांनी ओलसर झालेली बोरं छोट्याशा पिशव्यात भरून घेताना आम्हा मुलांचा आनंद डोळ्यांत भरून राहयाचा. बोरांच्या झाडावर पाळत ठेवून असलेले हिरवे पोपट नि रानपक्षीही बोरांचा स्वाद घ्यायचे. पाखरांचा नि मुलांचा हा अनोखा मेळा या उत्तरेकडील ओढ्याकाठी असलेल्या बोरवनात



भरलेला असायचा. बोरांनी भरलेल्या पिशव्या घेऊन आम्ही दिवसभर ओढ्याकाठी भटकायचो आणि ओढ्यामध्ये पोहायचो.

उत्तरेकडील ओढ्याकाठी असलेली हिरवी झाडे, वाहते पाणी पाहून मन अगदी भारावून जात असे. उन्हाळ्याच्या दिवसांत तर आम्ही दिवसभर निर्मळ धारेत पोहून शेवाळाखालचे मासे हाताच्य चंबूत धरता येतात का ते पाहावे. काही वेळाने वाळूत अंग माखून पुन्हा ओढ्याच्या निर्मळ धारेत अंघोळी करायचो. त्यात आम्हाला फार समाधान वाटे. तसेच खेकडे, मासे पकडणे आणि ओढ्याकाठच्या झाडावरील होले - पारवे या पक्ष्यांची घरटी शोधून त्यामधील अंडीव पिले पाहणे. ओढ्याकाठी असलेला गावरान रानमेवा खाऊन ओल्या वाळूत लहान झरा काढून त्याचे अमृतासारखे गोड पाणी ओंजळीने पोटभर प्यावे. या ओढ्याकाठच्या भटकंतीमुळे पाय अगदी थकून जात. परंतु दिवसभर ओढ्याकाठी हिंडताना जीव अगदी रमून जाई. रात्री झोपेतसुद्धा दिवसभर पाहिलेल्या दृश्यांची स्वप्नेही पडत असत.

काही दिवसांनी माझ्या वडिलांनी पाच एकरांची शेती उत्तरेकडील ओढ्याच्या शिवारातच घेतल्याने मी आणि माझी भावंडे याच ओढ्याच्या पांदीतल्या रस्त्याने नेहमी ये-जा करीत असत. बालपणातली जो जो आठवण करू लागलो तो तो लहान - लहान अनुभवलेला तपशीलही मला आठवू लागले. ओढ्याकाठी गेल्या - गेल्या पहिली अंघोळ करायची. अंगावरचे कपडे आपल्या हाताने पांढरफेक धुऊन उन्हात कडक वाळवायचे.

उत्तरेकडील ओढ्याकाठी गेलो तर बालपणी पाहिलेला ओढा आणि आताचा ओढा यामध्ये फार अंतर पडलेले होते. ओढ्याच्या पूर्वेला मोठ्या पाझर तलावाची निर्मिती होऊन तिथे ओढ्याचे पाणी अडविलेले होते. बोरवनाच्या जागी आता मोसंबीची बाग दिमाखदारपणे उभी होती. ओढ्याकाठी असलेल्या शेरांची रांग तोडलेली होती. पूर्वी सुस्थितीत पाहिलेल्या मित्राला दहा - बारा वर्षांनी दुस्थितीत पाहिल्यावर जसे वाटावे तसे मला वाटले. आणि त्यात तर हा माझ्या गावचा ओढा होता तो. माझ्या रम्य-स्मृती त्याच्याभोवती होत्या. ओढ्यातून चालत-चालत पश्चिमेस नागमोडी झालेल्या ओढ्यापर्यंत गेलो. पुन्हा परत फिरून पूर्वेकडे पाझर तलावापर्यंत गेलो. पण काय ओढ्याला पाणी नाही ? फक्त पावसाळ्यात चांगदा पाऊस पडल्यावरच ओढा वाहतो आणि गोदावरील जाऊन मिळतो. ओढ्याकाठी असलेली झाडे-बाभळी-लिंब लोकांनी जळण्यासाठी तोडल्या. माझे मन मोठे उदास झाले. माझे वडील शेतामध्ये औत हाणता-हाणताच मरण पावले होते सोबत असलेल्या मजुराने त्यांना गाडीबैलाने याच ओढ्यातल्या पांदीच्या रस्त्याने घरी आणले होते. ती वाट दिसताच माझ्या मनात कालवाकालव होऊन माझे अंतःकरण भरून आले. मी वाळूत पाय रूतवून स्तब्ध उभा होतो. गावाला ओढा नाही म्हणजे ते गाव कसलं! खरच ओढ्याशिवाय गावाला शोभा येत नाही.



# संचालक योगेश जाधव यांचा संभाजीनगर येथे भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वाणेगाव येथील काशिनाथ जाधव सेवानिवृत्त अधिकारी तथा जिल्हाअध्यक्ष शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांचे चिरंजीव योगेश जाधव कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पदी निवड झाल्यामुळे आर.आर पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष विनोद भैय्या पाटील अभिजीत देशमुख संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती छ. संभाजीनगर येथे स्वागत व सत्कार करण्यात आला फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीचा निवडणुकीचा निकाल 30 एप्रिल रोजी निकाल लागला या निवडणुकीत भाजपा शिंदे गट विरुद्ध महाविकास आघाडी सामना रंगला यामध्ये भाजपा शिंदे घटाने कृषी उत्पन्न बाजार समितीवर बहुमताने जागा पटकावली यामध्ये शिंदे गटाकडून योगेश काशिनाथ जाधव सहकारी संस्था सर्वसाधारण यांनी सुद्धा बाजी मारली त्यांचा कुठलाही राजकीय पार्श्वभूमी नसताना शिंदे गटातर्फे निवडून आल्यामुळे त्यांचा फुलंब्री तालुक्यामध्ये त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# सीएस डॉक्टर साबळे यांचे पाटोदा ग्रामीण रुग्णालयात सर्जिकल स्ट्राइक

## हातात घेतला झाडू तर गैरहजर डॉक्टरांचे पगार कपात

आधुनिक केसरी न्यूज



**पाटोदा :** ग्रामीण रुग्णालयात गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास डॉक्टर साबळे यांनी अचानक भेट देऊन रुग्णालयाची पाहणी केली यावेळी रुग्णालयामध्ये प्रचंड अस्वच्छता आढळून आल्याने स्वतः बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सुरेश साबळे यांनी हातामध्ये झाडू घेऊन रुग्णालय स्वच्छता केली बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर सुरेश साबळे आल्या पासून बीडच्या आरोग्य यंत्रणेत मोठ्या प्रमाणावर बदल झालेला पाहिला मिळत आहे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे स्वतः ग्राउंड वर जाऊन रुग्णांच्या अडचणी सोडविण्याचे प्रमाणिक पणे प्रयत्न करत असतात पाटोदा ग्रामीण रुग्णालयाची ऑन द स्पॉट पाहणी करताना तेथील अस्वच्छता आढळून आल्यामुळे तात्काळ हातात झाडू घेऊन सर्व स्टाफ नर्स कर्मचारी यांना सोबत घेऊन स्वच्छता करून घेत नंतर ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे धडे दिले आपल्या घराची जशी काळजी घेतो तशी रुग्णालयांची काळजी घ्या रुग्णालय म्हणजे आपले घर समजून स्वच्छता ठेवत जा अशा सूचना करून दांडी बहादर कर्मचाऱ्यांना फोनवरून चांगलेच झापुन दांडी बहाद्दर डॉक्टर कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे पगार कपात करुन पुन्हा असे निदर्शनास आले तर कायदेशीर कारवाई करणार असा धमकी वजा प्रेमाचा इशारा दिला डॉक्टर साबळे यांच्या अचानक सर्जिकल स्ट्राइकने मात्र पाटोदा ग्रामीण रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर धावपळ पाहण्यास मिळाली तसेच पत्रकार करांना बोलताना डॉक्टर साबळे म्हणाले यापुढे अशा सरप्राईज भेटी देत जाऊ यांने रुग्णालयाची ही स्वच्छता राहते व रुग्णालयातील रुग्णांनाही चांगली सेवा मिळते तसेच ग्रामीण रुग्णालयातील अडचणी जाणून घेत लवकरच पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील सर्व सेवा सुरळीत करू असा शब्द डॉक्टर सुरेश साबळे यांनी पत्रकारांशी बोलताना दिला.

# मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते नवीन इमारत उद्घाटन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** बुधवार दि. ३ मे २०२३ रोजी श्री सत्य साईबाबा संघटना, पुणे शाखा यांच्या सात लाख रुपये आर्थिक मदतीतून विकसित झालेल्या 'जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरणतळेवस्ती लोहगाव' या शाळेच्या नवीन वास्तूचे उदघाटन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी धर्मेश वैद्य ( अध्यक्ष श्री सत्य साईबाबा संघटना, महाराष्ट्र ) दिवाकर सर, राकेश व खुशी नवानी, नरेश हिराणी, बालविकासप्रमुख दिल्लीशाखेतील श्रीम. पदमा ताई, श्रीम. वैशाली ताई, शाखा पुणे, भूषण जोशी गटविकास अधिकारी हवेली, संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथ.) पुणे, उपशिक्षणाधिकारी आस्मा मोमीन, उपशिक्षणाधिकारी मुकुंद देंडगे, गटशिक्षणाधिकारी हवेली, नीलिमा म्हेत्रे, हवेली पंचायत समिती माजी सभापती अशोकबापू खांदवे, केंद्रप्रमुख लोहगाव, अंकुश बढे, केंद्र समनव्यक सुनील बासुतकर, हवेली तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष रमेश कुंजीर व केंद्रातील मुख्याध्यापक व शिक्षक, संदीप गायकवाड त्याच प्रमाणे सत्य साई सेवा संघटना चे सर्व सदस्य इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आयुष प्रसाद यांनी जिल्हा परिषद शाळा हरणततळेवस्ती मध्ये नयनरम्य वास्तू उभी राहिल्याने मुलांचे शिक्षण आनंददायी वातावरणात पार पडेल, त्यामुळे शाळेची पटसंख्या वाढेल, असे मत व्यक्त केले. त्याच बरोबर मुलांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा संदेश देताना आपला मुख्य कार्यकारी अधिकारी पर्यंतचा प्रवास कसा झाला व ते होण्यासाठी शिक्षण हेच एकमेव माध्यम कसे आहे हे सांगितले. शाळेत गेले दोन वर्षे एकमेव शिक्षिका तृप्ती तोडकर या कार्यरत असून त्यांनी अविरत केलेल्या प्रयत्नांसाठी त्यांच्या कार्याचा गौरव केला. सत्य साई संघटनेचे धर्मेश सर यांनी मनोगतातून छोटा का होईना पण संस्कार व सेवा देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे हे सांगितले. त्यावेळी पदमा ताईंनी बालविकासाचे जीवनातील महत्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या नवीन वास्तूच्या निर्माणासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका तृप्ती नितीन तोडकर, व्यंकटेश सर, संजय सर यांनी अथक परिश्रम घेतले. तृप्ती तोडकर यांनी मनोगतातून २०१४ पासून आतापर्यंत कशा पद्धतीने शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी, त्यांच्यावर योग्य संस्कार करण्यासाठी कोणकोणते उपक्रम राबवले गेले याची माहिती दिली.

कार्यक्रमनंतर सर्वांनी रुचकर जेवणाचा आस्वाद घेतला. त्यानंतर सर्वजण आपापल्या मार्गाने मार्गस्थ झाले परंतु माझे पालक विदयार्थी यांनी सर्व स्वछता, साहित्य आवरण्यास मोलाचे सहकार्य केले.




# कृषी आधारित उद्योग आणि रोजगार संधी या विषयावर परिसंवादाचे यशस्वी आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयात कृषी आधारित उद्योग आणि रोजगार संधी या विषयावर परिसंवादाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे अध्यक्ष, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेजुळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुदाम नलावडे आणि प्राचार्य डॉ संजय गायकवाड यांची उपस्थिती होती. या परिसंवादा दरम्यान डॉ जिंतूरकर मॅडम आणि प्रा वीणा तळीकोटकर मॅडम यांनी कृषी उद्योग आणि रोजगार संधी विषयी विद्यार्थी आणि उपस्थिताना विस्तृत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ संजय गायकवाड यांनी कृषीक्षेत्र हे यशस्वी आणि स्वालंबी जीवन घडविण्यासाठी उत्तम संधी यावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. शेजुळे यांनी केला. हा परिसंवाद यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्य डॉ विवेक घोलप, प्रा. लोखंडे, प्रा. अंकुश गायकवाड आणि सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर

जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

सौजन्य : इंटरनॅशनल स्पोर्टस,
2, सरस्वती संकूल, सिटी बँकजवळ, एस.बी. बसस्टँडसमोर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर. मो. 9673538888

# क्युरेटिव्ह पीटिशन प्रक्रिया सोपी नाही

## राजेंद्र दाते पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** उपचारात्मक याचिकेची क्युरेटिव्ह पीटिशन प्रक्रिया भारताच्या राज्यघटनेच्या कलम १३७ द्वारे उपचारात्मक याचिकेचे समर्थन केले जाते. कलम १४५ अन्वये केलेल्या कायद्याच्या आणि नियमांच्या बाबतीत, सर्वोच्च न्यायालयाला त्याद्वारे दिलेल्या कोणत्याही निर्णयाचे किंवा आदेशांचे पुनरावलोकन करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट मत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन पुढे बोलतांना ते म्हणाले की, निकालाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत उपचारात्मक याचिका करणे आवश्यक आहे.

पुनर्विलोकन याचिका फेटाळली गेली असेल तरच याचिका कर्ता क्युरेटिव्ह याचिका दाखल करू शकतो. तसेच याचिका कर्त्या कडून पुनर्विलोकन याचिका कोणत्या कारणास्तव करण्यात आली आणि ती प्रचलित करून फेटाळण्यात आली हे स्पष्टपणे सांगणे किंवा ठामपणे सांगणे आवश्यक आहे या साठी सर्वोच्च न्यायालयातील कुठल्याही एक वरिष्ठ वकिलाने प्रमाणित केले पाहीजे.

पुढे त्यांनी विस्ताराने नमुद केले की,नैसर्गिक न्याया च्या तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यास उपचारात्मक याचिका स्वीकारली जाते. याचिका विचारात घेण्याचे अतिरिक्त कारण म्हणजे न्यायालयाने निकाल देताना त्याचे/तिचे म्हणणे ऐकले नाही. उपचारात्मक याचिका तीन ज्येष्ठ-सर्वाधिक न्यायाधीशांचा समावेश असलेल्या खंडपीठाकडे आणि शक्य असल्यास मूळ निकाल -शिक्षा सुनावलेल्या न्यायाधीशांकडे पाठविली जाते. जेव्हा आणि केवळ बहुसंख्य न्यायाधीशांनी निर्णय दिला की या प्रकरणाची सुनावणी आवश्यक आहे, तेव्हा याचिका त्याच खंडपीठासमोर सूचीबद्ध केली जाऊ शकते.

खुल्या न्यायालयात सुनावणीची विनंती केली गेली असेल, तर अशा सुनावणीस परवानगी आहे, परंतु उपचारात्मक याचिकेवर सहसा चेंबरमधील न्यायाधीशां द्वारे निर्णय घेतला जातो.जर याचिकेत वाजवी विचारासाठी कोणतेही कारण नसेल तर न्यायालय याचिकाकर्त्यावर "अनुकरणीय खर्च" लादू शकते.

आमच्या प्रतिनिधी सोबत विशेष बातचीत करतांना जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, क्युरेटिव्ह याचिका मंजुर झाली तर काय ? नामंजूर झाल्यास मे २०२१ चा घटनापीठाचा अंतीम निर्णय आंमलात येतो व त्यातील घटनापीठाने केलेल्या निरीक्षणा वरून राज्य शासनास मार्गक्रमण करावे लागेल त्यात मराठा समाजाचे मागासपण नव्याने सिध्द करणे - त्या साठी नवा आयोग त्यांचा आहवाल त्यास मंजुरी आदी सर्व प्रक्रिया राबविल्या जाऊ शकतात. आता यात परत नव्याने सर्व प्रक्रिया कराव्या लागतील त्या म्हणजे - आयोग स्थापना कारणे - आयोगाचा मराठा समाजाच्या बाजूने अहवाल प्राप्त करून घेणे - नंतर राज्य शासनाने तो स्वीकारणे तोपर्यंत लोकसभा व विधानसभा निवडणुका संपलेल्या असतील आणि सत्तेवर -एक तर भाजपा किंवा आघाडी सरकार असेल या अहवालास स्विकारून कायदा करावा लागेल, अनेकवेळा सर्वच पक्षांनी कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावण्याची भूमिका घेतली आहे त्यामुळे, मग ५०% च्या आतील मागणीस दोन तृतीयांश बहुमत कसे मिळणार ? मग त्यासाठी ५०% च्या आतून लवकरात लवकर मीळण्यासाठी इतर कोणता पर्याय ? ५० % च्या पुढे दिलं गेलं तर

परत वरुन मांनगुटावर इंद्रा सहानी केस ची ५०% मर्यादा आहेच - कोणीही उच्च न्यायालयात जाईल व सांगेल की,महाराष्ट्र शासनाने पुन्हा ५०% मर्यादा ओलांडली हा इंद्रा सहानी केसच्या ५०% मर्यादेचा हा अवमान आहे असे सुद्धा पुढे येणार आहे.शासनाचा अध्यादेश परत रद्द होईल ?यावर उपाय व उत्तर काय ? कोर्टानं जर विचारले की १९९४ पासुन आज पर्यंत आपण शांत का होता ? एवढा उशीर का केला ? तुमचा एवढा मोठा विलंब कसा स्विकारायचा ? याचे उत्तर शोधावे लागणार आहे. अनेक ठिकाणी असे प्रश्न विचारले जातात की, अशा स्थितीत मराठा समाजाने काय करावे ? फक्त वाटच पहावी काय ? आरक्षण ५० टक्के आत की बाहेर ? या विषयावर मराठा समाजाच्या अंतिमहिता साठी राज्यस्तरीय आरक्षण मंथन परिषद आवश्यक असुन मराठा समाजाला लवकरात लवकर आरक्षण मिळवणे व समाजाचा सर्वांगीण विकास करणे त्यासाठी घटनात्मक संविधान वाटचाल करणे गरजेचे असल्याची चर्चा समस्त मराठा समाजात आहे.

मराठा समाजासाठी प्रामाणिकपणे कार्यरत सर्व समन्वयक,विधीतज्ञ,अभ्यासक, आंदोलक, वेगवेगळ्या मराठा संघटनेचे पदाधिकारी यांनी उपस्थित राहून पुढील वाटचाल करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. मराठा समाजाच्या हितासाठी प्रगतीसाठी सर्वांनी हजर राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**आरक्षणाच्या कायदेशीर बाजूंचे मंथन आवश्यक आहे काय ?**

राज्यस्तरीय मराठा आरक्षण मंथन परिषद मराठा समाजासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या हितचिंतक लोकांच्या विनंती मान देऊन मराठा समाजाच्या प्रगतीसाठी कोथुर्णे, पोस्ट . पवनानगर, ता . मावळ, जि . पुणे तारीख ०६ मे २०२३ रोजी आयोजीत होत असल्यामुळें समाज बांधवांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत . मराठा आरक्षण ५०% च्या आतून की ५०% च्या पुढे ही चर्चा होणे आवश्यक असल्याचा विचार आयोजकांनी केला असल्याची बाब पहिल्यांदाच पुढे आली आहे . चार दोन लोकांच मत म्हणजे समाजाचे मत असे म्हणून कसे चालेल अनेक विधीतज्ञ म्हणतात की, सर्वोच्च न्यायालयाच्या सन्माननीय घटनापीठाने दिलेल्या निकाला प्रमाणे मराठा समाजाला त्यांचे मागासपण नव्याने सिद्ध करावे लागेल .

# काचीगुडा ते बिकानेर विशेष रेल्वे

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये होणारी गर्दी लक्षात घेता दक्षिण-मध्य रेल्वेने काचीगुडा ते बिकानेर दरम्यान साप्ताहिक विशेष गाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. वाशीम, अकोलामार्गे धावणारी ही गाडी ६ मे पासून सुरू होणार आहे. २७ जूनपर्यंत ही गाडी धावणार आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेकडून देण्यात आली.

गाडी क्र. ०७०५३ (काचीगुड़ा-बीकानेर विशेष) ही गाडी ६ मेपासून आठवड्यातून दर शनिवारी रात्री ९:३० वाजता काचीगुडा येथून प्रस्थान करून सोमवारी दुपारी १:५० वाजता बिकानेर स्थानकावर पोहोचणार आहे. ही गाडी आगामी २४ जूनपर्यंत धावणार आहे. अकोला स्थानकावर ही गाडी रविवारी सकाळी ९:२० वाजता येणार आहे. परतीच्या प्रवासात गाडी क्र. ०७०५४ ( बीकानेर- काचीगुडा विशेष ) ही गाडी दर मंगळवारी रात्री ८:१५ वाजता बिकानेर येथून रवाना होऊन गुरुवारी सकाळी ९:४० वाजता काचीगुडा स्थानकावर पोहोचणार आहे. ही गाडी बुधवारी रात्री ९:२५ वाजता अकोला स्थानकावर येईल. या गाडीत प्रथमश्रेणी वातानुकुलीत, द्वितीय श्रेणी वातानुकुलीत, तृतीय श्रेणी वातानुकुलीतसोबतच स्लिपर व जनरल डबे असणार आहेत.


# शेतकऱ्यांची फसवणूक; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** माडसांगवी येथील द्राक्ष उत्पादकाची परप्रांतीय व्यापाऱ्याने १२ लाखाहून अधिक रकमेला फसवणूक केली. या प्रकरणी दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारभारी निमसे यांची माडसांगवी परिसरात द्राक्ष शेती आहे. त्यांच्याशी संशयित मोहमंद उस्मानी ( रा. बिहार ) या परप्रांतीय व्यापाऱ्याने ओळख वाढवि विश्वास संपादन केला. ३५ रुपये किलो दराने त्यांच्या शेतातील द्राक्षमाल १३ लाख, ९६ हजार ७०३ रुपयांना खरेदी केला. पहिल्या टप्प्यात व्यापाऱ्याने तीन लाख, ५० हजार रुपये दिले. परंतु, उर्वरित १२ लाख, ४६ हजार ७०३ रुपये देण्यास टाळाटाळ केली. सातत्याने पाठपुरावा करुनही पैसे न दिल्याने आपली फसवणूक झाल्याचे निमसे यांच्या लक्षात आले. त्यांनी दिंडोरी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# श्रीमती विमल उत्तमराव सेवेकर यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** पांडुरंग कॉलनीतील रहिवासी श्रीमती विमल उत्तमराव सेवेकर ( वय ८५ वर्षे ) यांचे दि. ३ मे २०२३ रोजी रात्री ११.४५ वाजता राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. ४ मे रोजी सकाळी कैलाश नगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हेडगेवार हॉस्पिटलचे संतोष सेवेकर व महाराष्ट्र बॅकेंचे सुरेश सेवेकर यांच्या त्या मातोश्री होत्या.

# बोगस कामे; ३ कोटी, ५० लाखांचा चुराडा

## प्रकाश सोळंके यांची तक्रार



आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मनसेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे केलेल्या तक्रार निवेदनात म्हटले आहे की, जालना जिल्ह्यात मे सई कंट्रक्शन या एजन्सीने बोगस काम करण्यासाठी २०१४ पासून धुमाकूळ घातला आहे. या कंट्रक्शन कंपनीने पीडब्ल्यूडीचे उप अभियंता ते कनिष्ठ अभियंता संबंधित कर्मचारी यांना हाताशी धरून बोगस इस्टिमेट तयार करून त्याला मंजुरी आणल्यानंतर अनेक ठिकाणी काम न करता एजन्सी बिल उचलून घेते. ज्या ठिकाणी संबंधित एजन्सी काम करते. त्या ठिकाणी ५० टक्के काम संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून बोगस काम करते. याचे उत्तम उदाहरण : तालुका परतुर येथील पीडब्ल्यूडी अंतर्गत रामा. २२३ ते दैठणा,माव,पांडेपोखरी ते रामा.६१ प्रजिमा ४१ रस्त्यावर ३ कोटी, ५० लाख रुपय खर्च होत आहे. रस्त्याचे काम अंदाजा पत्रकाप्रमाणे होत नसून संबंधित सई कन्ट्रक्शन या एजन्सीने पन्नास टक्के काम बोगस करून शासकीय निधी चुना लावला. या कामावरती दुर्लक्ष केले म्हणून उप अभियंता परतुर, कनिष्ठ अभियंता वाघमारे परतुर यांनी शासकीय कामात कुचराई दिरंगाई मुद्दाम दुर्लक्ष केले. म्हणून बडतर्फ करण्यात यावे संबंधित साई कंट्रक्शन एजन्सीवर ब्लॅक लिस्ट करून कारवाई करण्यात, या कामावरती तीन किलोमीटर रस्त्यावर विहिरीवरच्या दगडाचे ढीग टाकून रस्ता ब्लॉक केला आहे. या रस्त्यावरून पूर्णपणे दळणवळण बंद आहे, शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामाचे दिवस आहेत. परंतु संबंधित एजन्सी ना रस्ता बंद केला ड्रायव्हरच्या केले नाही रस्ता का बंद केला. हे सुद्धा कळायला तयार नाही. काही ठिकाणी रस्त्याचे हॉट मिक्स डांबरीकरण केले. ते डांबरीकरण काम हाताने उखडू लागले. या रस्त्यावरच्या फुलाचे काम न करता संबंधित एजन्सी बिल उचलून घेणार आहे. अगोदर फुलाचे काम व्हायला हवे होते नंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात व्हायला हवी होती. परंतु पुलाचे काम झाले असे दाखवले जुन्या फुलांची डाग दुखी करून नवीन बांधकाम केले असे चित्र निर्माण करून शासनाला दिवसाढवळ्या फसवले आहे. साई कंट्रक्शन ही कंपनी कोणाच्या मालकीची आहे. हा संशोधनाचा भाग आहे कारण या एजन्सी संबंधित राजकीय नेते आहेत का कारण ही एजन्सी कुठल्याही कामाच्या अटी व शर्ती चे उल्लंघन करून बोगस काम करण्यास माहिर आहे सुद्धा या सई कंट्रक्शनवर कठोर कारवाई झालेली नाही. कारण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने या एजन्सीने बोगस काम केले. म्हणून अनेक वेळा निवेदन देऊन सरकारकडे तक्रारी करण्यात आल्या. परंतु सई कंट्रक्शन ला अद्याप हि ब्लॅक लिस्ट केले नाही. या बोगस पद्धतीच्या कामामुळे देशासह राज्याचे नुकसान होते बोगस काम केल्यामुळे अनेक वेळा त्याच त्याच रस्त्याचे डबल डबल काम करावे लागते शासनाचा पैसा जातो सामान्य जनतेला नहाक त्रास सहन करावा लागतो म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मागणी आहे. संबंधित उपअभियंता कनिष्ठ अभियंता यांना बडतर्फ करून, सई कंट्रक्शने जालना जिल्ह्यात अनेक ठिकाणी बोगस काम केल्यामुळे या एजन्सीला मराठवाड्यात काम करण्यास बंदी घालावी, या एजन्सीच्या पाठीमागे नेतृत्व उभे असल्यामुळे चौकशी होईल किंवा नाही अशी शंका आहे ? परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणून जनतेसमोर मांडणार आहोत. या रस्त्याची पाहणी करताना सोबत मनसे उपजिल्हाध्यक्ष राम नवल, या भागातील दळणवळण करणारे शेतकरी उपस्थित होते.

# स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका पूजन व पालखी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे दि.५/५/२३ शुक्रवार रोजी अनंत कोटी विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या गावात पादुका पूजन व पालखी सोहळा आणि प्रवचन जगद्गुरु शंकराचार्य भक्त श्री नरेंद्र स्वामी महाराज यांच्या दिंडी सोहळा व प्रतिमापूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला याप्रसंगी श्री सद्गुरु देव अखिल भारतीय हिंदू संग्राम सेनेचे श्रीक्षेत्र सावळदबारा येथील व पंचक्रोशीतील बुलढाणा व जळगाव जिल्ह्यातील अनेक भक्तगण उपस्थित होते याप्रसंगी जीवनामध्ये आचार विचार व सद्गुण चांगले असले तरच माणसाचा विकास होऊ शकतो. त्यासाठी जगा व जगू द्या हा उपदेश सद्गुरूंनी जगाला दिला आहे. शेगाव निवासी सद्गुरु गजानन महाराज यांच्या कृपाशीर्वादाने जगाला शांतीचा संदेश देणारे सद्गुरु श्री स्वामी नरेंद्र महाराज यांच्या विचारांची देवाण-घेवाण करण्यात आली याप्रसंगी अनेक भक्त मन उपस्थित होते. संपूर्ण श्री क्षेत्र सावलदबारा गावांमध्ये पायी दिंडी काढून पालखी मिरवणूक काढण्यात आली स्वामींची प्रतिमा पालखीमध्ये ठेवून गावामध्ये सडा, रांगोळ्या टाकून पालखींचे दिमागदार सोहळा पार पडला यावेळेस गावातील भक्तजन मोठ्या संख्येने महिला व पुरुष मंडळी उपस्थित होते मिरवणुकीचे खास आकर्षण म्हणजे सर्व युवा या कार्यक्रमांमध्ये भगवा ध्वज घेऊन उपस्थित होते प्रत्येकाने संग्राम सेनेची भगवी साडी व भगवा आत्तापर्यंत करून एकंदरीत भगवे मे वातावरण झाले होते अशा या कार्यक्रमाची सांगता हरिहर मंदिर सावलडबारा येथील महाप्रसादाचा लाभ घेऊन झाली यावेळेस गावातील सर्व भक्तगण उपस्थित होते.यावेळी प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते, भोकरे सर शांताराम खराटे समाधान गायकवाड, पिटु नरोटे सुभाष टीकारे विठ्ठल गायकवाड ,कुंडलिक काळे, टिटवी,डाभा, देव्हारी, मोलखेडा, येथील समस्त भक्तगण व वारकरी संप्रदायाचे श्री क्षेत्र सावळदबारा येथील हभप. वासुदेव महाराज खडके, हभप. आबाराव महाराज कोलते, हभप.भागवत महाराज महाजन, सुनील राजपूत, गजानन सुरपाटणे, पंढरी सपाटे, आकाश कळस्कर, शैलेश जयस्वाल,सोपान मानकर, हरी भांबेरे, हरी साबळे, हभप. विशाल महाराज खडके इत्यादी वारकरी उपस्थित होते अशी सविस्तर माहिती प्राध्यापक जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते यांनी दिली.





# वैजापुरात बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या "बुद्ध पौर्णिमा" निमित जेतवन बुद्ध विहार ,दुर्गावाडी मित्र परिवार व शहरातील विविध ठिकाणच्या मित्र मन्डळ यानी एकत्र येऊन भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची रथातून भव्य मिरवणूक काढण्यात आली,या मिरवणूकी दरम्यान आ. रमेश पा. बोरनारे,नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यानी प्रतिमा पूजन करुन भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला अभिवादन केले शहरातील मुख्य रस्त्यावरुन ही मिरवणूक जेतवन बुद्ध विहार येथे समाप्त झाली. या ठिकाणी धोंडीरामसिंह राजपूत यानी भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवन कार्याविषयी उपस्थित साधक-सधिका याना मार्गदर्शन केले या समयी प्रमूख उपस्थिती माजी उपनगराध्यक्ष अकिल शेख यांची होती,सुत्रसंचालन व प्रास्ताविक अशोक पगारे व सुनिल त्रिभुवन यानी केले. एच. आर. भुईगळ यांनी वंदना म्हटली. यानंतर खिरदानव अन्नदान कार्यक्रम ही झाला. या प्रसंगी एम. आर. गणवीर, प्रा. प्रमोद पठारे, से.नि. प्राध्यापक डि.एस. गायकवाड, साहेबराव पडवळ, विलास त्रिभुवन, हरिभाऊ बागुल, राजेश गायकवाड, विशाल शिंदे, तांबुस आप्पा, कोसे आप्पा, विलास, म्हस्के, दिवेकर, दिपक त्रिभुवन, किरण त्रिभुवन व बौध्द ऊपासक, उपसिका मोठ्या सन्खेने उपस्थित होत्या.

# मधमाशांचा वऱ्हाडावर हल्ला; ५० जणांना घेतला चावा

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** मधमाशांच्या पोळीवर दगड मारल्याने मधमाशांनी लग्नसमारंभातील वऱ्हाडावर हल्ला चढविला. यामध्ये ५० जणांना चावा घेतला असून, ४ जण गंभीर जखमी झाले. ही घटना नेर तालुक्यातील कामनदेव येथे घडली. या घटनेने लग्नासाठी आलेल्या व-हाडी मंडळीची चांगलीच तारांबळ उडाली असून, अन्नाची प्रचंड नासधुस झाली आहे. नेर तालुक्यातील कामनदेव येथील रहिवासी जगन राठोड यांच्या मुलीचा विवाह दारव्हा तालुक्यातील आरंभी येथील युवकाशी ठरला होता. आज ४ मे रोजी कामनदेव येथील मंदिरात विवाह आयोजित करण्यात आला होता. लग्नाचा विधी आटोपल्यानंतर दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास कोणीतरी खोडसाळ पणा करुन आग्या मधमाश्यांच्यि पोळीवर दगड मारला. यावेळी मधमाश्यां नी व-हाडी मंडळीतील ५० जणांवर अचानक हल्ला चढवित चावा घेतला. यावेळी लग्न समारंभात उपस्थित झालेल्या पाहुणे सैराट पळत सुटल्याने चांगलीच तारांबळ उडाली. या पळपाळीत अन्नाची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली. दोन लहान मुलांसह अनेक महिला जखमी झाल्या असून, जखमींना बोरगाव लिंगा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तर काहींना यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची माहिती सुत्रांनी दिली.





# अवकाळी पावसामुळे भाजीपाला स्वस्त

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** अवकाळी पावसात भाजीपाला व अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, भाजीपाल्याचे भाव वाढण्याऐवजी स्वस्त झाल्याची आकडेवारी पुढे आली आहे. किलो मागे पालक दहा रुपये, चवळी शेंगा दहा, पान कोबी दहा, फुलकोबी दहा, भेंडी पंधरा ते वीस, गवार तीस, टमाट पंधरा, वांगे पाच ते दहा रुपये किलो विकल्या जात आहे. भाव वाढतात पण दहा दिवसांपूर्वी चढत्या उन्हात भाजीपाला करपू लागला होता. या पावसाने त्यास संजीवनी मिळाली आहे. ढगाळ वातावरण भाजीस पोषक असल्याचे शेतकरी सांगत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. ठोक बाजाराची अशी स्थिती असल्याने भाजी उपटून फेकून द्यायची का असा सवाल शेतकरी वर्तुळातून येतो. चिल्लर विक्रीत सामान्य ग्राहकांना किमान चाळीस रुपये किलोचाच दर पडत आहे.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर